


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १५ • अंक ३५५ •शनिवार, दि. ४ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com



सागर भारूकाचे आरोप तथ्यहिन

(पान ८ वर)

# दस्त नोंदणीतील 'बड्या माशां'च्या चौकशीची गरज!

1 लाचखोर अधिकाऱ्यांचे जळगावात 'घबाड'

2 मुद्रांक शुल्क विभागातील भ्रष्टाचाराचा हिमनग

3 १० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले

## दस्त नोंदणी कार्यालयातील एजंट आणि अधिकाऱ्यांच्या हात मिळवणीचे काय



प्रतिनिधी दि. ४ जुलै

**अकोला:** 'सर्वसामान्यांचे रक्त शोषणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एक मोठा हादरा दिला आहे. अवघ्या १० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्या गेलेल्या अकोल्याचे सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी किरण चौधरी यांच्या जळगाव येथील घरावर पडलेल्या धाडीत तब्बल ३ कोटी रुपयांचे काळे घबाड हाती आले आहे. या कारवाईने महसूल आणि मुद्रांक शुल्क विभागात प्रचंड खळबळ उडाली असून, 'हा तर फक्त हिमनगाचा शेंडा आहे, विभागातील इतर बड्या माशांचीही अपसंपदा तपासा!' अशी आक्रमक मागणी आता जनतेतून जोर धरू लागली आहे.

### झडतीत काय काय जप्त झाले?

» जळगाव येथील घर म्हणजे पैशांची खाणच असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशील दिला आहे. दीड कोटी रुपये कॅश, सोन्याचे दागिने ६० लाख रुपये, सोने खरेदीच्या पावत्या११ लाख रुपये, खरेदीखत आणि बक्षिसपत्रे ६२ लाख रुपये, एकूण जप्त मालमत्ता३ कोटी अशी माहिती प्राप्त झाली आहे.

### घरात नातेवाइकांचा छुप्या मार्गाने प्रवेश !

» अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाईपूर्वी किरण चौधरी यांचे जळगावच्या विष्णुनगर भागातील घर सीलबंद केले होते. मात्र, काळा पैसा आणि पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने संशयितांच्या काही नातेवाइकांनी या सीलबंद घरात छुप्या मार्गाने प्रवेश केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कायद्याला आव्हान देणाऱ्या या नातेवाइकांवर तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील पावले उचलली. चौधरी यांच्या पत्नी मनीषा चौधरी, शासकीय पंच, गोल्ड व्हॅल्यूअर आणि बँक कॅशियरच्या समक्ष घेतलेल्या मॅरेथॉन झडतीत जे समोर आले, त्याने तपास यंत्रणांचेही डोळे पांढरे झाले.

### 'त्या' छुप्या नेटवर्कचा बिमोड कधी होणार ?

» केवळ किरण चौधरी यांच्यावर कारवाई करून चालणार नाही, तर या संपूर्ण विभागाची 'स्वच्छता मोहीम' राबवण्याची गरज आहे. सध्या अकोला पोलीस आणि लाच लुचपत प्रतिबंधक विभाग किरण चौधरी यांच्या बँक खात्यांची आणि इतर बेनामी मालमत्तेची चौकशी करत आहेत. मात्र, एजंट आणि दस्त नोंदणी विभागातील कर्मचाऱ्यांचे हे छुपे वसुली नेटवर्क लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पाडून टाकणार का ? की इतर भ्रष्ट कर्मचारी व बडे अधिकारी यातून सहीसलामत सुटणार ? असा संतप्त सवाल आता जनतेतून विचारला जात आहे.

### दस्त नोंदणी विभाग की एजंटांचा अड्डा ?

अकोल्यात सध्या दस्त नोंदणीसाठी हजारो रुपये एजंटमार्फत उघडपणे घेतले जात असून विभागाचे कामकाज पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र आहे. बनावट लोकांना उभे करून दस्त नोंदणी करण्याचे गंभीर प्रकारही समोर येत आहेत. १० हजारांच्या लाचेचे मूळ थेट ३ कोटींच्या काळ्या पैशांपर्यंत पोहोचल्याने, सर्वसामान्य नागरिकांची होणारी आर्थिक पिळवणूक चव्हाट्यावर आली आहे.'हा तर केवळ हिमनगाचा शेंडा आहे. दस्त नोंदणी विभाग आणि एजंट यांच्यातील छुप्या वसुलीचे हे नेटवर्क अत्यंत मजबूत आहे. जर या विभागातील इतर वरिष्ठ आणि लाचखोर अधिकाऱ्यांच्या संपत्तीची सखोल चौकशी झाली, तर अजून मोठी बेनामी संपत्ती उघडकीस येईल!'

— सुजाण नागरिक, अकोला.

## » थोडक्यात

### सिंधू जल करार स्थगितच!

नवी दिल्ली: पाकिस्तानकडून सीमापार दहशतवादास आजही खतपाणी घालणे सुरू असल्याने भारताने सिंधू जल करारावरील स्थगिती अद्याप कायम ठेवली आहे', अशा शब्दांत भारताने पाकिस्तानला खडसावले आहे. 'भारताचा याविषयीचा पवित्रा सातत्यपूर्ण आहे', असेही भारताने म्हटले आहे. 'या कराराचा भंग करणाऱ्यांचे हात छाटले जातील', अशी दर्पोक्ती पाकिस्तानने नुकतीच केली होती. त्या पार्श्वभूमीवर रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी हे प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने सीमापार दहशतवादास प्रोत्साहन देणे कायमस्वरूपी बंद करायला हवे. तसेच, या धोरणाची त्यांनी हमी देण्याची गरज असून त्यात भविष्यात बदल होता कामा नये. मात्र, आजही त्यांच्याकडून सीमापार दहशतवादास खतपाणी घातले जात आहे. त्यामुळे सिंधू जल करारास स्थगिती देण्याचे आमचे धोरण कायम आहे, असे जयस्वाल म्हणाले.

---

### खासगी रुग्णालयांवर नियंत्रणासाठी नवे विधेयक!

मुंबई : राज्यातील सर्व प्रकारची खासगी रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनिक, डायग्नोस्टिक सेंटर, पॅथॉलॉजी लॅब आणि डे-केअर सेंटर यांना एकाच कायद्याच्या चौकटीत आणण्यासाठी 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट (नोंदणी व नियमन) विधेयक, २०२६' शुक्रवारी विधानसभेत मांडण्यात आले. या विधेयकामुळे खासगी आरोग्यसेवेत पारदर्शकता वाढविणे, रुग्णांची आर्थिक पिळवणूक रोखणे व किमान आरोग्यसेवा सुनिश्चित करण्याचा उद्देश आहे. सर्व खासगी रुग्णालये, क्लिनिक, मॅटर्निटी होम, डिस्पेन्सरी, सॅनिटोरियम, पॅथॉलॉजी, जेनेटिक व रेडिओ-डायग्नोस्टिक प्रयोगशाळांना नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे.

# दिलीप वळसे पाटील राज्याचे नवे अर्थमंत्री होणार?

प्रतिनिधी दि. ४ जुलै



**पंढरपूर :** महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या अर्थमंत्री पदावरून पुन्हा एकदा जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. हे महत्त्वाचे पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाकडे येणार असल्याचे बोलले जात असून, यासाठी ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर दिलीप वळसे पाटील यांनी पंढरपुरात विठ्ठल दर्शनासाठी आले असता माध्यमांशी संवाद साधला. 'मी अर्थमंत्री होणार, ही चर्चा फक्त माध्यमांमध्ये सुरू असून याबाबतचा अंतिम निर्णय आमचे पक्षश्रेष्ठी योग्य वेळी घेतील,' असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर हे खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दिले जाईल, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशन संपूनही अर्थ खाते अजूनही मुख्यमंत्र्यांकडेच असल्याने अजित पवार गटातून या पदासाठी जोरदार मागणी केली जात आहे.

### उपमुख्यमंत्री शिंदे रुग्णालयात दाखल!



**ठाणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणिशिवसेनेचे (शिंदे गट) सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना शुक्रवारी ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांच्यावर सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरु असून एकनाथ शिंदे यांनी प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे.

# ठाकरेंनी आंदोलन पुकारल्यावर 'आरएसएस'ने दिले निवेदन!

## राम मंदिर देणगी घोटाळाप्रकरण ; राऊतांची टीका

प्रतिनिधी दि. ४ जुलै



**मुंबई :** राम मंदिर देणगी घोटाळाप्रकरणी चौकशी सुरू आहे. या चौकशीतून अनेकविध धक्कादायक माहिती समोर येत आहे. त्यामुळे राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई रामरक्षा आंदोलनाची हाक दिली. त्यानंतर आता संजय राऊत यांनी मोठा दावा केला आहे. उद्धव ठाकरेंनी आंदोलन पुकारल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राम मंदिर देणगी घोटाळाप्रकरणी निवेदन दिले, असे संजय राऊत म्हणाले. शनिवारी ते माध्यमांशी बोलत होते. 'राम मंदिर देणगी घोटाळाप्रकरणी कारवाई होईल. पण कारवाई होताना दिसत नाही. एखाद्या गुन्ह्यात जेव्हा पाचपेक्षा जास्त लोक सहभागी असतात, तेव्हा ती चोरी नसते, तो दरोडा असतो. त्यामुळे राम मंदिरावर दरोडा पडला आहे. राम मंदिराच्या ट्रस्टवरच कारवाई व्हायला हवी, कारण ते कर्तव्यास मुकले आहेत', असं संजय राऊत म्हणाले.

# अकोला शहराचा पाणी पुरवठा लांबणार

## सात दिवसाआड होणार पाणीपुरवठा

प्रतिनिधी दि. ४ जुलै

अकोला शहराला तुर्तास पाच दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. पण, धरणातील घटता जलसाठा पाहता सात दिवसाआड पाणी पुरवठा करण्याच्या हालचाली महापालिकेत सुरु आहे. अकोलेकरांना पाणी टंचाई पाहता पाणी बचतीचा मार्ग स्विकारावा लागेल. काटेपुर्णा प्रकल्पातून अकोल्याला पाणी पुरवठा केला जातो. काटेपुर्णा प्रकल्पात १६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे. अर्थात केवळ १९ टक्के जलसाठा महान येथील धरणात आहे.

तर वान प्रकल्पात ३४ दशलक्ष घनमीटर पाणी असून तो साठा देखील ३४ टक्के इतका आहे. असे असताना आता भविष्यातील पाणी पुरवठ्याचे नियोजन पाहता ते लांबण्याचे चिन्हं आहे. अकोला महापालिका शहरातील नागरिकांना दर पाचव्या दिवशी पाणी पुरवठा करत आहे. तो भविष्यात सातव्या दिवशी करण्याची प्रशासनाची तयारी सुरु झाली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात यावर अमलबजावणी झाल्यास सातव्या दिवशी अकोलेकरांना पाणी पुरवठा होईल.

### भरधाव एसटी बसेस धडकल्या!

जालना : वडिगोद्री महामार्गावर आज शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला आहे. अंबड तालुक्यातील शहापूरजवळ गल्हाटी नदीच्या पुलावर अंबड आगाराच्या २ एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक झाल्यानं एकच खळबळ उडाली. या भीषण अपघातात प्राथमिक माहितीनुसार ३० ते ४० विद्यार्थी व प्रवासी जखमी झाले असून, त्यामध्ये मोठ्या संख्येने शाळकरी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे जखमींना तातडीनं बाहेर काढून अंबड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं.

# कारंजा ते मानोराच्या कुपटा घाटात अपघात

## तिप्पर-कारची समोरासमोर धडक, दोघांचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी दि. ४ जुलै



वाशिम जिल्ह्यातील कारंजा-मानोरा मार्गावरील कुपटा घाटात आज सकाळी साडेदहाच्या सुमारास भीषण अपघात झाला. कुपटा येथून मानोराकडे जाणाऱ्या कारची टिप्परशी समोरासमोर धडक होऊन कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातामुळे काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. प्राथमिक माहितीनुसार, एक कार कुपटा येथून मानोराकडे जात असताना घाटात भरधाव वेगाने समोरून येणाऱ्या टिप्परची जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की कारचा चुराडा झाला आणि कारमधील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच 108 रुग्णवाहिकेचे पायलट लक्ष्मण चव्हाण तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर दोन्ही मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी मानोरा ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले.अपघाताची माहिती मिळताच पोलीसही घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.मृतांची ओळख आणि अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शनिवार दि. ४ जुलै २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

**सहयोगी बँकांचे विलीनीकरण (१९५९ आणि २०१७)१९५९ चा कायदा :** १९५९ मध्ये केंद्र सरकारने एक कायदा करून संस्थानांच्या ताब्यातील ८ बँकांना एसबीआयच्या सहयोगी बँका बनवले.

**महा-विलीनीकरण (२०१७) :** १ एप्रिल २०१७ रोजी एसबीआयने आपल्या ५ सहयोगी बँका (उदा. स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, स्टेट बँक ऑफ पतियाळा) आणि 'भारतीय महिला बँक' यांचे पूर्णपणे स्वतःमध्ये विलीनीकरण केले. यामुळे एसबीआय जगातील सर्वात मोठ्या बँकांच्या यादीत सामील झाली.

आजची आधुनिक एसबीआय (२०२६ मधील स्थिती)

आज एसबीआय केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील एक वित्तीय महासत्ता बनली आहे. सध्या बँक ५२ कोटींहून अधिक ग्राहकांना सेवा देत असून तिचे जाळे २३,००० पेक्षा जास्त शाखा आणि ६०,००० हून अधिक एटीएमसह जगभरातील २९ देशांमध्ये पसरले आहे. 'वायओएनओ' सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे ही बँक आज पूर्णपणे हायटेक झाली आहे.

# देशातील सर्वात मोठी अन् विश्वासार्ह बँक ' एसबीआय ' !

## 1 जुलैला झाली होती बँकेची स्थापना

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत बँक ही महत्त्वाची संस्था असते. एखाद-दुसऱ्या दिवसासाठी जरी बँकांचे व्यवहार बंद राहिले, तरी देशाची आर्थिक व्यवस्था खीळ घातल्यासारखी होते. देशाच्या आर्थिक प्रगतीत त्या देशातील बँकांचा फार मोठा सहभाग असतो. बँकांच्या विकासासोबतच देशाचा विकास घडून येतो. त्यादृष्टीने भारतीय बँकांचा प्रवास व विकास कसा झाला हे महत्त्वाचे ठरते. देशातील सर्वात मोठी आणि सर्वात विश्वासार्ह बँक कोणती? या प्रश्नाला भारतीय स्टेट बँक हे उत्तर येतं. स्टेट बँक ऑफ इंडियाला २०० वर्षांहून अधिक दिवस झाले आहेत. आज ही देशातील सर्वात मोठी बँक आहे. मात्र, इथंपर्यंत पोहोचण्याची बँकेची कहाणी खूप रंजक आहे. आज १ जुलै हा या बँकेचा स्थापना दिवस आहे. शाखा आणि कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेतल्यास स्टेट बँक जगातील सर्वात मोठी बँक आहे. भारतीय स्टेट बँक ही सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. या बँकेला हे नाव १९५५ मध्ये मिळाले. परंतु आज बँक ज्या शिखरावर पोहचली आहे. याचा प्रवास २ शतकाहून अधिक जुना आहे. या बँकेच्या स्थापनेचा प्रवास १८०६ सालापासून सुरू होतो.

**एसबीआयच्या लोगोविषयी...**

१९५५ साली जेव्हा भारतीय स्टेट बँक अस्तित्वात आली. तेव्हा बँकेचा लोगो वटवृक्षाचे झाड होते. मात्र, १९७० मध्ये हा लोगो पूर्णपणे बदलण्यात आला. वटवृक्षाऐवजी, निळ्या रंगाचे वर्तुळ, ज्याच्या तळाशी एक लहान कट आहे, असा लोगो तयार करण्यात आला. हा लोगो अहमदाबाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या माजी विद्यार्थी असलेले शेखर कामत यांनी तयार केला होता. एसबीआयच्या नव्या लोगोची रचना ही गुजरातमधील कांकरिया तलावापासून प्रेरित असल्याचे काही जणांनी म्हटलं होते. एसबीआयचा लोगो हा कांकरिया तलावाचा नकाशाप्रमाणे असल्याचे काही जणांचे म्हणणे होते. मात्र, हे शेखर कामत यांनी हे नाकारले.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी (इम्पीरियल बँक)**

एसबीआयचा इतिहास २०० वर्षांपेक्षा जास्त जुना आहे. ब्रिटिशांच्या काळात १८०६ मध्ये 'बँक ऑफ कलकत्ता' (नंतर 'बँक ऑफ बंगाल') सुरू झाली. त्यानंतर 'बँक ऑफ बॉम्बे' (१८०४) आणि 'बँक ऑफ मद्रास' (१८४३) या तीन प्रेसिडेन्सी बँका स्थापन झाल्या.

२७ जानेवारी १९२१ रोजी या तिन्ही बँकांचे विलीनीकरण करून 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया' ची स्थापना करण्यात आली.

स्वातंत्र्यानंतर, ग्रामीण पत पाहणी समितीच्या शिफारशीनुसार भारत सरकारने १ जुलै १९५५ रोजी 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया'चे राष्ट्रीयीकरण केले.

या राष्ट्रीयीकरणानंतर तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे करण्यात आले.

बँक ऑफ कलकत्ता २ जून १८०६ रोजी सुरू झाली होती. तिचे २ जानेवारी १८०९ रोजी बँक ऑफ बंगालमध्ये रुपातंर झाले. १५ एप्रिल १८४० रोजी बँक ऑफ बॉम्बे आणि १ जुलै १८४३ रोजी बँक ऑफ मद्रासची स्थापना झाली. बँक ऑफ बॉम्बे आणि बँक ऑफ मद्रास या त्या काळातील प्रमुख बँका होत्या. बँक ऑफ बॉम्बे आणि बँक ऑफ मद्रास यांचे २७ जानेवारी १९२१ रोजी बँक ऑफ बंगालमध्ये विलीनीकरण झाले. तिन्ही बँका मिळून इंपीरियल बँक ऑफ इंडिया तयार करण्यात आली.

देश स्वतंत्र झाल्याच्या सुमारे ८ वर्षांनंतर भारतीय स्टेट बँक ॲक्ट १९५५ अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेने इंपीरियल बँक ऑफ इंडिया ताब्यात घेतली. यानंतर इंपीरियल बँक ऑफ इंडियाचे नाव बदलले आणि १ जुलै १९५५ रोजी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली. १९६० मध्ये एसबीआयने ७ बँकांचे नियंत्रण संपादन केले. या सर्व पूर्वीच्या वेगवेगळ्या राज्यांच्या बँका होत्या. ज्याचे नाव आणि लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या धर्तीवर ठेवले. या सहयोगी बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ बीकानेर ॲण्ड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ इंदूर, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पटियाला, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र आणि स्टेट बँक ऑफ त्रावणकोर यांचा समावेश आहे. १ एप्रिल २०१७ रोजी या बँका स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाल्या.

**मुख्यालय :** नरीमन पॉईंट, मुंबई (महाराष्ट्र) स्वामित्व : ही भारत सरकारची सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. शाखा आणि कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या दृष्टीने ही जगातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक आहे. तीन प्रेसिडेन्सी बँकांची स्थापना (१८०६ - १८४३) या बँकेची पाळेमुळे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात रोवली गेली. भारताचा व्यापार सांभाळण्यासाठी ब्रिटिशांनी तीन वेगवेगळ्या प्रांतांत तीन प्रमुख बँका (ज्यांना 'प्रेसिडेन्सी बँका' म्हटले जाई) सुरू केल्या.

१) बँक ऑफ कलकत्ता : २ जून १८०६ रोजी स्थापना झाली, जिचे नाव नंतर 'बँक ऑफ बंगाल' करण्यात आले.

२) बँक ऑफ बॉम्बे : १५ एप्रिल १८४४० रोजी मुंबईत स्थापना झाली.


३) बँक ऑफ मद्रास : १ जुलै १८४३ रोजी चेन्नई (मद्रास) येथे स्थापना झाली.

**इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचा उदय (१९२१) :** पहिल्या महायुद्धानंतर देशातील बँकिंग व्यवस्था मजबूत करण्यासाठी ब्रिटिशांनी २७ जानेवारी १९२१ रोजी वरील तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांचे विलीनीकरण केले. या एकत्रिकरणातून 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया' अस्तित्वात आली. १९३५ मध्ये 'भारतीय रिझर्व्ह बँक'ची स्थापना होईपर्यंत ही इम्पीरियल बँकच भारताची मध्यवर्ती बँक म्हणून काम पाहत होती.

राष्ट्रीयीकरण आणि 'एसबीआय' चा जन्म (१९५५) भारत स्वतंत्र झाल्यानंतर ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी एका मोठ्या सरकारी बँकेची गरज होती. त्यानुसार, 'गोरवाला समिती' (ग्रामीण पत पाहणी समिती) च्या शिफारशीवरून भारत सरकारने १ जुलै १९५५ रोजी 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया'चे राष्ट्रीयीकरण केले. याच दिवशी या बँकेचे नाव बदलून 'स्टेट बँक ऑफ इंडिया' (भारतीय स्टेट बँक) ठेवण्यात आले.

## कर्जमुक्ती : भविष्याची गुंतवणूक

नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. या योजनेचा लाभ म्हणजे शेतकरी बांधवांच्या उज्वल भविष्यासाठी गुंतवणूक ठरणार आहे. याविषयी या लेखात उहापोह करण्यात आला आहे.... कर्जमुक्ती केवळ खर्च नाही; ती राज्यातील अन्नदात्यांच्या भविष्यावर केलेली खरी गुंतवणूक आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' कडे पाहताना ही भावना प्रकर्षाने जाणवते. ही योजना केवळ थकीत कर्जाची रक्कम माफ करण्यापुरती मर्यादित नाही, तर शेती, शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्याने सक्षम करण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे.



महाराष्ट्रातील शेती ही आजही मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, महापूर, गारपीट, रोगराई आणि वाढता उत्पादन खर्च या संकटांनी शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. अशा वेळी अनेक शेतकरी पीक कर्ज घेतात; मात्र प्रतिकूल परिस्थितीमुळे वेळेत परतफेड करता येत नाही. परिणामी ते नव्या पीक कर्जासाठी अपात्र ठरतात. कर्जाचे चक्र वाढत जाते आणि शेती करण्याची क्षमता कमी होत जाते. अशा दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढणे, हा या योजनेमागील मूलभूत विचार आहे.

शासनाने या वेळी केवळ कर्जमाफी जाहीर करून थांबण्याचा मार्ग स्वीकारलेला नाही. उलट, शेतकरी पुन्हा सक्षम व्हावा, त्याला नव्याने कर्ज उपलब्ध व्हावे आणि शेतीतील गुंतवणूक वाढावी, या उद्देशाने योजनेची रचना करण्यात आली आहे. म्हणूनच कर्जमुक्तीबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली आहे. आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची ही भूमिका शासनाच्या संतुलित दृष्टिकोनाचे उदाहरण आहे.

या योजनेतील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे 'एकवेळ समझोता' (ध्हा ऊग्स एूतसहू) ही संकल्पना. पूर्वी कर्जाची रक्कम निर्धारित मर्यादेपेक्षा थोडी जास्त असल्यामुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहत होते. आता अशा शेतकऱ्यांना स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासनाकडून निर्धारित मर्यादेपर्यंतचा लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेत येण्याची संधी मिळणार आहे. ही तरतूद केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक न्यायाचीही आहे. महाराष्ट्रातील विशेषतः पश्चिम महाराष्ट्राचा विचार केला तर येथे ऊस, भात, फळबागा, भाजीपाला, दुग्धव्यवसाय आणि प्रक्रिया उद्योग यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली आहे. मात्र, सिंचनाची उपलब्धता असूनही बदलते हवामान, वाढते मजुरीचे दर आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे येथील शेतकरीही आर्थिक तणावातून जात आहेत. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला की त्याचा परिणाम केवळ त्याच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही. कृषी सेवा केंद्रे, खत-बियाणे विक्रेते, वाहतूक, कृषी अवजारे, दूध व्यवसाय, लघुउद्योग आणि ग्रामीण बाजारपेठ यांनाही त्याचा थेट लाभ होतो. म्हणूनच शेतकऱ्याला दिलेला आधार हा प्रत्यक्षात संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेला आधार असतो.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यात आली आहे. बँकांकडून पात्र शेतकऱ्यांची माहिती थेट शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली जात आहे. आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक, संगणकीय पडताळणी, गावनिहाय लाभार्थी यादी आणि तक्रार निवारण व्यवस्था यामुळे लाभ वितरण अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकरी वंचित राहू नयेत आणि अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळू नये, याची विशेष काळजी घेण्यात आली आहे.

या योजनेमागे शासनाची आणखी एक व्यापक भूमिका दिसून येते. कर्जमाफी ही अंतिम उपाययोजना नसून, शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्याची पहिली पायरी आहे. यासाठीच कृषी पायाभूत सुविधा, सिंचन, पीक विविधीकरण, तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यवर्धन आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासारख्या दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर दिला जात आहे. त्यामुळे शेतकरी वारंवार कर्जाच्या चक्रात अडकणार नाही, हा शासनाचा प्रयत्न आहे. या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले, यालाही विशेष अर्थ आहे. रयतेचे कल्याण, जलव्यवस्थापन, शेती आणि ग्रामीण विकास यांना प्राधान्य देणाऱ्या या लोकाभिमुख शासकाच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाची ही योजना जाहीर करून शासनाने इतिहासातील लोककल्याणकारी परंपरा आधुनिक काळाशी जोडली आहे. आज कर्जमुक्तीची गरज केवळ कर्ज कमी करण्यासाठी नाही, तर शेतकऱ्याचा आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आहे. आर्थिक चिंता कमी झाली की शेतकरी अधिक धाडसाने नवे तंत्रज्ञान स्वीकारतो, उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतो आणि शेतीकडे उद्योग म्हणून पाहू लागतो. याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण ग्रामीण विकासावर होतो.


म्हणूनच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही. ती शासनाचा शेतकऱ्यावरील विश्वास, शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्याचा व्यापक संकल्प आहे. शेतकरी सक्षम असेल, तर शेती सक्षम होईल; शेती सक्षम झाली तर ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल; आणि ग्रामीण महाराष्ट्र समृद्ध झाला तरच विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल. हीच या योजनेमागील खरी प्रेरणा आणि दूरदृष्टी आहे.

विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती

## होमिओपॅथी उपचार पद्धतीचे जनक सॅम्युएल हानेमान !

ख्रिश्चन फेड्रिक स्यॅमुएल हानेमान यांचा जन्म १० एप्रिल १७५५ रोजी तर निधन २ जुलै १८४३ मध्ये झालेरु ते एक जर्मन वैद्यक होते. त्यांनी होमिओपॅथी या वैद्यकीयशास्त्राचा शोध लावला. १७८४ मध्ये तरुण वयातच त्यांना ड्रेसडेन येथे सर्जन जनरलची जागा मिळाली. त्यांनी त्यावेळी जुनाट व्रणरोगावर एक अपूर्व ग्रंथ लिहिला व हाडांच्या व्रणावर एक नवीन औषधी प्रक्रिया बसवली. सन १७९२ च्या आधी त्यांनी फ्रेंच, इंग्लिश व इटालीयन भाषांतून निरनिराळ्या १८ वैद्यक ग्रंथाचे भाषांतर केले, १७८४ मध्ये त्यांनी जुन्या आजारावर एक अपूर्व ग्रंथ लिहिला, या ग्रंथात त्यांनी असाध्य समजल्या जाणाऱ्या जुन्या रोगांवर जलोपचार व मसाजने मालिश करून रोगाचे हरण करण्याची पद्धतीबाबत माहिती दिली आहे. होमिओपॅथीचा शोध लावण्यापूर्वी स्यॅमुएल हानेमान याने केलेल्या प्रयोगांत त्याला बार्क ऑफ चायना म्हणजे सिंकोना नावाच्या वनस्पतीचा रस प्यायल्यावर स्वतःमध्ये मलेरियाची लक्षणे दिसून आली होती. परंतु सिंकोना हे औषध मलेरिया रोग बरा करण्यासाठी वापरत असत. रसामध्ये घातलेले पाणी औषधाचे गुणधर्म स्मरणात ठेवून त्याप्रमाणे रुग्णास गुण देत असले पाहिजे असा हानेमानाने तर्क केला.

स्यॅमुएल हानेमान यांना रसायनशास्त्राचे उत्तम ज्ञान होते. त्यांनी या विषयावर पुष्कळ लेख लिहिले आहेत. त्यांनी १७९३ व १७९९ च्या दरम्यान औषधी शास्त्रविषयक बरेच नवे ग्रंथ लिहिले. तेव्हापासून त्यास वैद्यकशास्त्रात प्रमाणभूत मानू लागले. १८१० साली ते लैप्झीक शहरी आले आणि होमिओपथिक औषधांचाच व्यवसाय करु लागले. १८१२ साली त्यांना लैप्झीक युनिव्हर्सिटीच्या वैद्यक शास्त्रावरील प्रोफेसरची जागा मिळाली आणि त्यांचा व्यवसाय फार जोमाने वाढू लागला. हे पाहून त्यांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे तेथील सर्व ॲलोपॅथिक लोक व केमिस्ट लोक एकवटले आणि त्यांनी स्यॅमुएल हानेमान यांच्यावर १८२० मध्ये एक खटला केला. जर्मनीत त्या वेळी असा कायदा होता की, डॉक्टर लोकांनी डिस्पेन्स (औषध) तयार करावे. हानेमान साहेब एम.डी. पास झालेले डॉक्टर असल्यामुळे त्यांनी औषध तयार करणे हे त्यावेळच्या कायद्याच्या विरुद्ध होते. म्हणून त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला व त्यांना औषध तयार करणे व देणे यावर बंदी घालण्यात आली. यानंतर स्यॅमुएल हानेमान यांनी लैप्झीक सोडले आणि ऑस्ट्रिया येथील अनाल्ट कोएथन येथे गेले. तेथे ड्यूक फर्डिनंड यांनी त्यांना त्यांच्या राज्यात होमिओपथिक औषधे तयार करण्याचा अधिकार दिला व पुढे त्यांच्या औषधांनी रोग्यास उत्तम गुण आल्याचे पाहून १८२२ मध्ये त्यास राज्यमंत्री ही पदवी दिली.



**होमिओपॅथीचा पाया**

निरोगी माणसाच्या शरीरात जे आजाराचे लक्षण निर्माण करण्याची ताकद औषधात असते, तेच औषध आजारी माणसाला दिल्यास त्याचा आजार बरा होतो, हा सिद्धांत डॉ. सॅम्युएल यांनी मांडला. त्यांनी औषधशास्त्रावर अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. 'ऑर्गॅनॉन ऑफ मेडिसिन' हा होमिओपॅथीचा पाया मानला जाणारा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. वैद्यकीय शिक्षणासोबतच त्यांना इंग्रजी, फ्रेंच, इटालियन अशा अनेक भाषा अवगत होत्या, ज्याचा उपयोग त्यांनी वैद्यकीय पुस्तकांच्या भाषांतरासाठी केला.

# भारतीय तिरंग्याचे मूळ रचनाकार पिंगाली वेंकय्या !

पिंगाली वेंकय्या (नामभेद व्यंकय्या) यांचा जन्म २ ऑगस्ट १८७६ रोजी तर मृत्यू ४ जुलै १९६३ मध्ये झाला. ते एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक व महात्मा गांधींचे कट्टर अनुयायी होते आणि ज्या ध्वजावर भारतीय राष्ट्रध्वज आधारित होता त्याचे डिझायनर होते. त्यांचा जन्म एका तेलुगू पद्मशाली ब्राह्मण कुटुंबात भातलापेनुमारु, मछलीपट्टणमजवळ, आंध्र प्रदेश राज्यात झाला. इ.स. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी विविध तथाकथित राष्ट्रीय ध्वज भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सदस्यांनी वापरले होते. कृष्णा जिल्ह्यातील पिंगली व्यंकय्या यांनी राष्ट्रध्वजाची रचना केली आणि एप्रिल १९२१ रोजी विजयवाडा शहराच्या नंतरच्या भेटीदरम्यान महात्मा गांधींना तो सादर केला. द हिंदू मधील माहिती नुसार, 'पिंगली व्यंकय्या हे शेतकरी आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी मछलीपट्टणम मध्ये एक शैक्षणिक संस्था स्थापन केली होती. इ.स. १९६३ मध्ये त्यांचा गरिबीत मृत्यू झाला.

भारतीय समाजाने मात्र त्यांची दखल त्यावेळी घेतली नाही. इ.स. २००९ मध्ये त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकार तर्फे एक टपाल तिकीट जारी करण्यात आले. तसेच २०११ मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याचा प्रस्ताव देखील ठेवण्यात आला. परंतु या प्रस्तावावर केंद्र सरकारचा निर्णय अद्याप झालेला नाही.



आज पुण्यतिथी

वेंकय्या वयाच्या १९ व्या वर्षी ब्रिटिश भारतीय सैन्यात दाखल झाले आणि दुसऱ्या बोअर युद्धादरम्यान ( १८९९-१९०२) दक्षिण आफ्रिकेत सेवा बजावली . त्यांच्या सेवेदरम्यान, त्यांनी भारतासाठी राष्ट्रीय ध्वजाची गरज ओळखली कारण भारतीय सैनिकांना ब्रिटिश ध्वज असलेल्या युनियन जॅकला सलामी देणे आवश्यक होते. त्यांच्या अनुभवाने आणि नंतर कलकत्ता येथे १९०६ च्या एआयसीसी अधिवेशनात उपस्थित राहिल्याने प्रेरित होऊन, त्यांनी काँग्रेसच्या सभांमध्ये ब्रिटिश ध्वज फडकवण्याच्या प्रथेला विरोध करत, भारतीयांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ध्वजाची संकल्पना विकसित केली. व्यंकय्या यांनी १९२१ मध्ये गांधीजींच्या विजयवाडा भेटीदरम्यान महात्मा गांधींना भारतीय राष्ट्रध्वजाचा आराखडा सादर केला. सुरुवातीला या ध्वजात अनुक्रमे हिंदू आणि मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करणारे लाल आणि हिरवे पट्टे होते आणि गांधीजींच्या सूचनेनुसार, भारतातील इतर समुदायांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक पांढरा पट्टा जोडण्यात आला. हा ध्वज आराखडा १९२१ पासून काँग्रेसच्या सभांमध्ये अनौपचारिकपणे वापरला गेला आणि तो भारतीय राष्ट्रध्वजाचा पाया ठरला, ज्याला २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने अधिकृतपणे त्याच्या अंतिम स्वरूपात स्वीकारले. वेंकय्या यांनी मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भूगर्भशास्त्रात डिप्लोमा मिळवला. १९११ ते १९४४ पर्यंत, त्यांनी मछलीपट्टणम येथील आंध्रा नॅशनल कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून काम केले. १९२४ ते १९४४ पर्यंत, त्यांनी नेल्लोरमध्ये अभ्रकावर संशोधन केले . त्यांनी भूगर्भशास्त्रावर 'थल्ली रायी' नावाचे पुस्तकही लिहिले. वेंकय्या यांना 'डायमंड वेंकय्या' हे टोपणनाव देखील लोकप्रिय होते, कारण ते हिऱ्यांच्या खाणकामातील तज्ञ होते. त्यांना 'पत्ती वेंकय्या' (कापूस वेंकय्या) असेही म्हटले जात असे, कारण त्यांनी आपला बहुतेक वेळ कापसाच्या मुख्य जातींवर संशोधन करण्यासाठी समर्पित केला होता आणि कंबोडिया कॉटन नावाच्या जातीचा सखोल अभ्यास केला होता. ते एक बहुभाषिक होते जे जपानी आणि उर्दू यासह अनेक भाषांमध्ये पारंगत होते. त्यांनी १९१३ मध्ये बापटला येथील एका शाळेत जपानी भाषेत एक पूर्ण भाषण दिले. तेव्हापासून, त्यांना 'जपान वेंकय्या' म्हणूनही ओळखले जाऊ लागले. जेव्हा वेंकय्या १९०६ मध्ये दादाभाई नवरोजी यांच्या नेतृत्वाखाली कलकत्ता येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात सहभागी झाले, तेव्हा काँग्रेसच्या सभांमध्ये ब्रिटिश ध्वज फडकवण्याच्या कल्पनेला त्यांचा विरोध असल्याने, त्यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेससाठी ध्वज तयार करण्याची प्रेरणा मिळाली. वेंकय्या यांनी स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून नव्याने स्थापन झालेल्या स्वराज्य चळवळीसाठी ध्वज म्हणून वापरल्या जाऊ शकतील अशा संभाव्य डिझाइनवर काम केले. भारतीय संस्कृती, वारसा आणि इतिहासाशी संबंधित आणि वेगवेगळे महत्त्व असलेल्या ध्वजांचे २५ हून अधिक मसुदे होते. १९१६ मध्ये, त्यांनी ' भारत देशानिकी ओका जातीय पतकम' ( भाषांतर: भारतासाठी एक राष्ट्रीय ध्वज ) नावाचे पुस्तक प्रकाशित केले, ज्यात ध्वजासाठी ३० संभाव्य डिझाइन होते. १९१८ ते १९२१ पर्यंत, मछलीपट्टणम येथील आंध्र नॅशनल कॉलेजमध्ये काम करत असताना त्यांनी काँग्रेस नेतृत्वाला विविध कल्पना सुचवल्या. १९२१ मध्ये, अखिल भारतीय काँग्रेस समितीने ३१ मार्च आणि १ एप्रिल रोजी बेझवाडा (आताचे विजयवाडा) येथे आपले दोन दिवसीय महत्त्वपूर्ण अधिवेशन आयोजित केले होते. जेव्हा गांधीजींनी अधिवेशनात व्यंकय्या यांना ध्वजासाठी एक आराखडा सादर करण्यास सांगितले, तेव्हा त्यांनी ते तीन तासांच्या आत केले. व्यंकय्या यांनी गांधीजींना खादीच्या कापडावर ध्वजाचा एक प्राथमिक आराखडा दाखवला होता. हा पहिला ध्वज लाल आणि हिरव्या रंगाचा होता. लाल रंग देशातील हिंदूंचे आणि हिरवा रंग मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करत होता. गांधीजींच्या सूचनेनुसार, व्यंकय्या यांनी देशात उपस्थित असलेल्या सर्व पंथ आणि धर्मांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक पांढरा पट्टा जोडला.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
शनिवार दि. ४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गुडघ्याभर पाण्यातून जात विद्यार्थी घेताहेत ज्ञानाचे धडे !

## रुईखेड जि.प.शाळा जलमय, चिमुकल्या विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** तालुक्यातील सातपुड्याच्या कुशीत वसलेले आदिवासी भागात रुईखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांच्या शाळेच्या पटांगणात संपूर्ण पाण्याने जलमय होऊन दुर्गंधी चिखल पाण्याचे गटार होण्याचा धोकादायक प्रकार उघडकिस आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येत असल्याने पालक वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

आदिवासी दुर्गम भाग गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून या शाळेला खूप मोठे महत्त्व असून शाळेमध्ये एक ते सात वर्ग आहेत व १०१ पटसंख्या आहे मोठी संख्या असून या शाळेचा नावलौकिक दरवर्षी नवोदय विद्यालयात मुले इथून जात



असल्यामुळे जिल्हाभर नव्हे तर राज्यभर आहे. परंतु.गावाच्या मुख्य स्टँडवर घाणीचे साम्राज्य व चिखल गटार याचा सामना गावातील नागरिक सह विद्यार्थ्यांना वाट शोधावी लागते. शाळेचे मैदान हे सखल असल्यामुळे स्टॅन्ड वरील संपूर्ण गावातील नालीचे दुर्गंधीचे दूषित पाणी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सरळ उतरते. यावर्षी ही तिसरी वेळ असून विद्यार्थ्यांचा जीव गुदमरत आहे. आज रोजी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने या नालीच्या पाण्याचे व दुर्गंधी गटाराचे नियोजन लावले नाही. या गटारामुळे जिल्हा परिषद शाळा संपूर्ण परिसर हा घाणीच्या साम्राज्यात नालीचे दूषित पाणी चिखल व दुर्गंधीने माखला आहे.

ही समस्या आम्ही गेल्या वर्षापासून बघत आहोत. यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शारीरिक हाल हा प्रश्न आम्हा पालकांना स्वतःवत आहे त्यामुळे याची लवकरात लवकर विल्हेवाट शासन आणि प्रशासनाने लावावी ही आम्हा सर्व शाळेतील पालकांची मागणी आहे.

**गोपाल शेंडे**, एक संतप्त पालक.

.....

शाळेमध्ये मुरूम बोलावला आहे. या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील.

**दादाराव भास्कर,**
जि.प. शाळा, मुख्याध्यापक

# बेपत्ता दोन अल्पवयीन मुलांचा काही तासांत शोध

प्रतिनिधी ४ जुलै



**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहरातील गजानन नगर परिसरातून बेपत्ता झालेल्या दोन १३ वर्षीय अल्पवयीन मुलांचा अवघ्या काही तासांत सुखरूप शोध घेण्यात मूर्तिजापूर शहर पोलिसांना आणि महाराष्ट्र पोलीस बाईज संघटनेला यश आले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांनी पोलीस बाईज संघटनेच्या सदस्यांचा सत्कार करून त्यांच्या तत्परतेचे कौतुक केले.

गजानन नगर येथील एका महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचा मुलगा अक्षय गझलवार (वय १३) व त्याचा मित्र आकाश लाल नंदा (वय १३) हे २ जुलै रोजी सकाळी सुमारे ६ वाजता घराबाहेर गेल्यानंतर परत न आल्याने मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. त्याचवेळी महाराष्ट्र पोलीस बाईज संघटना, मूर्तिजापूरचे अध्यक्ष संदीप हरिदास घाटे यांच्या नेतृत्वाखाली विविध शोध पथके तयार करण्यात आली. संघटनेच्या सदस्यांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत अखेर दोन्ही मुले अमरावती रेल्वे स्थानकावर सुखरूप असल्याचा शोध लावला.

त्यानंतर मुलांना तातडीने मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी, पोलीस उपनिरीक्षक राजू वानखडे, हेड कॉन्स्टेबल इरफान, महिला पोलीस कॉन्स्टेबल उजमा व रेशमा यांच्या उपस्थितीत दोन्ही मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आले.

या शोधमोहिमेत शुभम जयस्वाल, प्रेम संजय बैतुले, प्रवीण वानखडे, अतुल गावंडे, आशू भेले, वैभव वानखेडे, साहिल वाघमारे, धीरज धाबाले, लकी थाटे, मानव दहातोंडे, पर्वेश गझलवार, आतिश इंगळे, आशिष वानखडे, यश बैतुले आणि आदेश इंगळे यांनी मोलाचे योगदान दिले.

# प्रभाग क्रमांक ९ मधील रखडलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात

वि. प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** अकोट शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात करण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत राजदे प्लॉट परिसरातील पटाईत यांच्या घरापासून विजय बेदरकर यांच्या घरापर्यंतच्या विकासकामांचा शुभारंभ नारळ फोडून व कुदळी मारून करण्यात आला.

या विकासकामांचे भूमिपूजन वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक इम्रान खान पठाण



आणि नगरसेविका सौ. लता कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजदे प्लॉट परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या कामामुळे परिसरातील रस्ते व मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत होणार असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत जेतवन नगर व आदर्श नगर परिसरातील विकासकामांनाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती दिली.

# काळेगाव येथे बजरंग बलींचा ४०० ग्रॅम सोन्याचा मुकुट चोरीला

प्रतिनिधी ४ जुलै

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या काळेगाव येथे घडली ही काळीमां फासणारी घटना,या परिसरात पंधरा दिवसात मंदिरातील चोरीची दुसरी घटना या आधी सिरसोली येथील गुप्तेश्वर महाराज मंदिरातील नागोबा चोरी झाला . येथून जवळ असलेल्या तसेच हिवरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील काळेगाव येथील बजरंग बली मंदिरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत सुमारे ४०० ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुकुट लंपास केल्याची घटना आज दुपारी पाच वाजताउघडकीस आली आहे आज रोजी अंदाजीत किंमत पाच लाखाच्या वर असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली असून भाविकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून बजरंग बलींच्या मूर्तीवरील सुमारे ४०० ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुकुट चोरी करून नेला. दुपारी मंदिर उघडल्यानंतर ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आली. त्यानंतर तातडीने हिवरखेड पोलीस स्टेशनला घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला आहे. संशयितांच्या हालचाली तसेच इतर तांत्रिक बाबींच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या चोरीच्या घटनेमुळे ग्रामस्थ व भाविकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून आरोपींना तातडीने अटक करून चोरीस गेलेला सोन्याचा मुकुट हस्तगत करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हिवरखेड पोलीस करत आहेत.

# हिवरखेड पोलिसांनी अवैध गोमांस घेऊन जाणाऱ्याला केली अटक

प्रतिनिधी ४ जुलै

**हिवरखेड :** हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या बेलखेड अकोली या मार्गावरून आरोपी हा मोटरसायकलने अवैध गौमासची वाहतूक करत असताना पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला रंगेहात अटक केली.

आरोपी जवळून एका गौवशाचे १२० किलोचे गौमास अंदाजे किंमत ३६ हजार गौमाससाठी वापरलेली मोटरसायकल अंदाजे ४५ हजार रुपयाची असा एकूण ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, आरोपी शेख अस्लम शेख तुकडू रा बेलखेड, याच्या विरुद्ध कलम ३२५ बी एन एस ३२५, ५५ (अ) ९९(अ) महाराष्ट प्राणी सुरक्षा अधिनियनुसा र गुन्हा दाखल करण्यात आला, हि कारवाई ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पी एस आय गोपाल गिलबिले, प्रवीण कुंजाम, विनोद खर्डे, रोहन बोराडे, यांनी केली

# मूर्तिजापुरात आत्मा शेतकरी सल्लागार समितीची सभा



प्रतिनिधी ४ जुलै

**मूर्तिजापुर :** कृषी दिनाचे अवचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय मूर्तिजापूर येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)अंतर्गत तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार आत्मा समिती (BFAC) सभा तालुका कृषी अधिकारी श्री दिपक तायडे सर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती.

सदर सभेमध्ये आत्मा योजना याविषयी सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक संदीप गवई यांनी नवनियुक्त सदस्यांना सविस्तर सन २०२६-२७ आत्मा मंजूर कृती आराखडामधील सुरू असलेल्या नैसर्गिक शेतीशाळा,पीक प्रात्यक्षिके,अभ्यास दौरा ,शेतकरी गट स्थापन करणे ,शेतकरी मित्र निवळ ,शेतकरी प्रशिक्षण या बाबत माहिती दिली तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे सर यांनी कृषी विभागातील सर्व योजनेची माहिती दिली,गट स्थापनेचे महत्व,खरीप हंगामातील विविध बाबी जसे बीजप्राकीय करणे,पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये ,बीबीएफ पेरणी करणे,नैसर्गिक खताचा वापर करणे या विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले तसेच सर्व उपस्थित समिति के नवनिर्वाचित अध्यक्ष व सदस्य सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच सदर शेतकरी सल्लागार समिती तालुकाअध्यक्ष पदी सौ. शामल भुषन कोकाटे याची सर्वानुमते निवड करण्यात आली तसेच उर्वरीत सदस्य कांताबाई विरुळकर,शुभांगी खंडारे,नंदाबाई जाधव,गीताबाई हजारी, राधिका काळे, आरती पोळकट, राजेंद्र इंगोले, रामभाऊ भारती, मयुर कोकाटे, सुधीर बोळे, गणेश ठाकरे, आशीष कोकाटे, आशीष डाबेराव, रोशन मुरळ, अरुण घाईट, गजानन ढोरे, गोपाल निंघोट, राजकुमार उबंडे,देवाण राठोड,राहुल गोलाम, दत्तराज राऊत यांची सदस्य पदी निवड जाहीर करण्यात आली.

# स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचा जल्लोषात नवीन सत्र प्रारंभ

वि. प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** शहरातील नामांकित स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चा प्रारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि मंगलमय वातावरणात करण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. रंगीबेरंगी सजावट, टाळ्यांचा कडकडाट, पुष्पवर्षाव आणि विविध उपक्रमांमुळे संपूर्ण शाळा परिसरात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. १ जुलै रोजी प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन होताच त्यांचे टाळ्यांच्या गजरात आणि पुष्पवर्षाव करून स्वागत करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता. तर दि. २ जुलै रोजी प्री-प्रायमरी विभागातील चिमुकल्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवातही तितक्याच उत्साहात आणि आनंदात करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुगे, पताका, स्वागत फलक आणि विविध कलात्मक सजावटींनी संपूर्ण परिसर उत्सवाचे स्वरूप धारण करून विद्यार्थ्यांना आपलेसे वाटणारे वातावरण निर्माण केले होते. या स्वागत सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष अशोक मंगलानी, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुरकुटे, उपाध्यक्ष दिलीप अग्रवाल, सचिव प्रा. मोबिन शेख, सहसचिव दिलीप चावडा, कोषाध्यक्ष मुरलीधर रामनानी तसेच संस्था सदस्य मेहुल नगदिया यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेचे मुख्याध्यापक हरीश पाचकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांच्या हस्ते स्वागताची रिबीन कापून नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, आपलेपणा आणि शाळेविषयीची आत्मीयता अधिक वाढली. दि. २ जुलै रोजी प्री-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाची सुरुवात पालकांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आली. या उपक्रमात पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामुळे शाळा आणि पालक यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ झाला आणि हा सोहळा अधिक संस्मरणीय ठरला.

यावेळी संस्था सदस्य मेहुल नगदिया यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत जिद्द, शिस्त, मेहनत आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर यशाचे शिखर गाठण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव प्रा. मोबिन शेख यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत नवीन शैक्षणिक वर्ष हे ज्ञानार्जन, संस्कार आणि सर्वांगीण विकासाचे वर्ष ठरो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

# कस्तुरीची 'वारी शिक्षणाची' आदिवासी वंचितांच्या दारी

प्रतिनिधी ४ जुलै

**अकोला :** शहरातील सामाजिक संस्था ' कस्तुरी' ने २ जुलै रोजी ' वारी शिक्षणाची' हा सेवाभावी उपक्रम अकोट तालुक्यातील ' जनुना' व ' वस्तापूर' या आदिवासी गावात राबवला. जि. प. प्राथमिक शाळेत वर्ग १ते ८ मध्ये शिकणाऱ्या २६० विद्यार्थ्यांना १लक्ष २५ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



माजी आमदार वसंतराव खोटरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास अकोटचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सूर्यवंशी ,कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ॲड. किशोर बुटोले , कार्यकारिणी सदस्य घनश्याम चांडक, उद्योजक कमलकिशोर हरितवाल उपस्थित होते. प्रकल्पाचे प्रमुख संजय गायकवाड आणि प्रा. ॲड. किशोर बुटोले यांनी कस्तुरीच्या प्रकल्पाविषयी आणि सेवाकार्याविषयी भूमिका मांडली.

गटशिक्षणाधिकारी मधुकर सूर्यवंशी,मुख्याध्यापिका सौ.बबिता सोळंके (जनुना) आणि मुख्याध्यापक संजय साळुंखे (वस्तापूर) यांनी कस्तुरीच्या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार वसंतराव खोटरे यांनी जनुना व वस्तापूर येथील शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन सौ. प्राजक्ता चोपडे आणि मनोज दुधे यांनी केले.

# जि. प. प्राथ. सेमी इंग्रजी शाळा जैनपूर पिंप्री येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



वि. प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** जि. प. प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, जैनपूर पिंप्री येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त प्रवेशोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि लोकसहभागातून साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी आणि संस्मरणीय व्हावी, या उद्देशाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, पूजा माळी, केंद्रप्रमुख लता डामरे, ग्रामसेवक गोपाल झामरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते ज्ञानदीप पालखीचे पूजन करून प्रवेशोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात भजन सादर करण्यात आले. त्यानंतर ज्ञानदीप पालखी आणि प्रभात फेरी काढण्यात आली. शिक्षणाचा संदेश देणाऱ्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. शाळेच्या आर्ट अँड क्राफ्ट विभागाने केलेली आकर्षक सजावट कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरली. रंगीबेरंगी फलक, शैक्षणिक संदेश, फुलांची सजावट आणि विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी शाळा परिसर नटला होता.

# सेंट पॉल्स अकॅडमी अकोट येथे शाळेचा स्थापना दिवस उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी अकोट येथे शाळेचा २७ वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . त्यानिमित्त आयोजित समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया यांनी भूषविले तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष लुनकरणजी डागा ,सचिव प्रमोद चांडक ,कोषाध्यक्षा रेखा चांडक, सदस्या शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक विजयजी बिहाडे व उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी ,रिंकू अग्रवाल , व्यवस्थापक प्रभुदासजी नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सुचिता गायकवाड, वैशाली गावत्रे



यांची मंचावर उपस्थिती होती .

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली .त्यानंतर शाळेच्या विद्यार्थिनींनी सुमधुर आवाजात स्वागत गीत सादर केले त्यांना डॉ.अर्चना रायबोले व योगेश चेडे यांची साथसंगत लाभली .पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले .याप्रसंगी गौरी बेराड व श्रेयस मानकर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील शिक्षिका अनिता सोनोने यांनी प्रास्ताविकपर भाषण केले .

इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड परीक्षेमध्ये सुवर्णपदक पटकावणाऱ्या मंदार थोरात आणि सुवर्णपदक व एक हजार रुपयांचा धनादेश मिळविणाऱ्या गार्गी वाघ यांचा सत्कार यावेळी संस्थाध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला तसेच इंडियन टॅलेंट ओलिंपियाड तर्फे शाळेला गोल्ड अवॉर्ड देऊन गौरवण्यात आल्याबद्दल व्यवस्थापक मंडळाने विजय सर ,ममता श्रावगी मॅडम, रिंकू अग्रवाल मॅडम व प्रभुदासजी नाथे सरांचे अभिनंदन करून त्यांचा सन्मान केला.शाळेतील शिक्षकांना सुद्धा आ.टी.ओ .मार्फत इन्स्पायरिंग टीचर अवार्ड देऊन गौरवण्यात आले . याच प्रसंगी शाळेतील शिक्षिका वनिता थोरात ,वैशाली देशपांडे, शिक्षक जयवंत भवाने यांना स्मृतीचिन्ह देऊन उत्कृष्ट शिक्षक म्हणून गौरवण्यात आले तसेच रेखाबाई यांचाही स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया यांची अकोला जिल्हा माहेश्वरी समाजाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा मुख्याध्यापकांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .शाळेच्या कोषाध्यक्षा रेखा चांडक यांची माहेश्वरी समाज जिल्हा अकोला च्या कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला . सकाळ सत्रातील पूर्व प्राथमिक वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सवही यावेळी साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना पेन्सिल ,चॉकलेट्स ,स्मायली बॉल देऊन त्यांचा आनंद द्विगुणीत करण्यात आला .यावेळी विविध कार्यक्रम घेण्यात आले . विजयजी बिहाडे यांनी आपल्या भाषणात शाळेचा उद्देश चांगलं शिक्षण देणे हा आहे. व्यवस्थापक मंडळाचे मार्गदर्शन व पालकांचा विश्वास, विद्यार्थ्यांवर घेतली जाणारी मेहनत यामुळेच संस्थेचा विकास झाला असल्याचे मत व्यक्त केले. प्रमोद चांडक यांनी विद्यार्थी व शिक्षकांना सकारात्मक दृष्टिकोन अंगिकारण्यासाठी प्रेरित केले. लुनकरणजी डागा यांनी शाळेच्या प्रगती बाबत समाधान व्यक्त केले.

## निधन वार्ता



**प्रेमकला रमेश मोरे**

**अकोला :** गुरुकुल नगर मलकापुर येथील रहीवासी श्रीमती प्रेमकला रमेश मोरे वय ७३ वर्ष यांचे दिं ३ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वा. निधन झाले, त्यांचेवर संधाकाळी ५ वा, सिंधी कॅम्प येथील स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या आपल्या मागे एक मुलगा एक मुलगी, सुन, नातवडे असा परिवार सोडून गेल्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ४ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# रस्त्यात बेशरमाचे झाड लावून संताप



## हरदडा फाटा येथे अनोखे आंदोलन

प्रतिनिधी ४ जुलै

**उमरखेड :** पुसद-हरदडा फाटा रस्त्याचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत दिलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता न झाल्याने संतप्त नागरिकांनी शुक्रवारी (ता. ३) हरदडा फाटा येथे रस्त्यात बेशरमाचे झाड लावून शासन व प्रशासनाचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह वाहनधारक व ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पावसामुळे रस्ता पूर्णपणे चिखलमय झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे धानकी परिसरातील सर्वपक्षीय नेत्यांनी नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी हे आंदोलन छेडले. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातांच्या घटनांत वाढ होत असल्याने संताप व्यक्त करण्यात आला. यापूर्वी हरदडा फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी संबंधित अभियंत्यांनी कंपनीच्या लेटरपॅडवर ३० जुलैपर्यंत रस्त्याच्या एका बाजूचे काम पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते. त्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते. मात्र, कामात अपेक्षित प्रगती न झाल्याने नागरिक पुन्हा आक्रमक झाले आहेत.शुक्रवारी झालेल्या आंदोलनादरम्यान रस्त्याने प्रवास करणाऱ्या अनेक वाहनधारकांनीही वाहने थांबवून निषेधात सहभाग नोंदविला. रस्त्याच्या कामाला गती देऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी काँग्रेसचे बाळासाहेब चंद्रे पाटील, मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख, आझाद समाज पक्षाचे जॉन्टी विणकरे यांच्यासह हरदडा येथील ग्रामस्थ व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेशरमाच्या झाडाला झेंडूचा हार घालून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न

## रखडलेल्या रस्त्याच्या कामाविरोधात वाकोडीकरांचा अनोखा निषेध



प्रतिनिधी ४ जुलै

**महागाव :** वाकोडी-सवना मार्गावरील रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून संथगतीने सुरू असल्याने संतप्त झालेल्या वाकोडीकरांनी शुक्रवारी अर्धवट रस्त्याच्या ठिकाणी बेशरमाचे झाड लावून त्याला झेंडूच्या फुलांचा हार घालत प्रशासन व संबंधित ठेकेदाराचा अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला.

रस्त्याचे काम अनेक ठिकाणी अपूर्ण अवस्थेत सोडण्यात आल्याने वाहनधारक, शेतकरी, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही भागात रस्ता उखडून ठेवण्यात आल्यामुळे खडी, मुरूम आणि मोठमोठ्या खड्ड्यांतून वाहने चालविणे धोकादायक बनले आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि ऑटोचालकांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पावसाळा सुरू झाल्याने अनेक ठिकाणी पाणी साचत असून, नाल्यांमधून पाणी वाहत असल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

अपूर्ण कामे, खड्डे आणि निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. मार्गावरील काही पूल अरुंद असल्याने समोरून येणाऱ्या वाहनांना वाट देताना मोठी जोखीम पत्करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर अनोख्या पद्धतीने निषेध आंदोलन करण्यात आल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. या वेळी मारुती डोरले, अभिजित देशमुख, राजेश्वर गावंडे, संजय डोरले, रोहित गावंडे, विनोद बिडवई, संकेत डोरले, रवी रेंगे, वैभव खंडागळे, ज्ञानेश्वर देशमुख, सदानंद आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# नेर येथे शंभरच्या स्टॅम्पसाठी हेलपाटे

प्रतिनिधी ४ जुलै

**नेर :** शहरात १०० रुपयांचा स्टॅम्पपेपर सहज उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्टॅम्प विक्रेत्यांकडून 'स्टॉक संपला', 'उद्या या', 'सध्या उपलब्ध नाही' अशी उत्तरे दिली जात असल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. तहसील कार्यालय, बँका, पतसंस्था, शैक्षणिक संस्था, न्यायालयीन कामकाज, विविध करारनामे तसेच अन्य शासकीय व खासगी व्यवहारांसाठी या स्टॅम्पपेपरची मोठ्या प्रमाणात गरज असते. मात्र आवश्यक मूल्याचा स्टॅम्प उपलब्ध नसल्याने अनेकांची कामे रखडत आहेत. काही विक्रेते १०० रुपयांचा स्टॅम्प उपलब्ध नसल्याचे सांगून अधिक मूल्याचा स्टॅम्प घेण्याचा सल्ला देत असल्याने कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे का, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. याप्रकरणी संबंधित विभागाने चौकशी करून नियमित पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी सांगितले की, शासकीय कामाच्या शपथपत्रासाठी स्टॅम्पपेपरची आवश्यकता नसून याबाबत सर्व सेतू केंद्रांना सूचना देण्यात आल्या आहेत.

मात्र, बँका व इतर विभाग त्यांच्या नियमानुसार स्टॅम्पपेपरची मागणी करू शकतात. त्यामुळे नागरिकांनी आवश्यकतेनुसारच स्टॅम्पपेपरचा वापर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# यवतमाळात गोवंशीय मांससाठा जप्त

## डीबी पथकाची कारवाई; ३५० किलो मांसासह साहित्य ताब्यात

प्रतिनिधी ४ जुलै

**यवतमाळ :** यवतमाळ शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तायडे नगर परिसरातील ताजबाग सोसायटीमध्ये छापा टाकून सुमारे ३५० किलो संशयित गोवंशीय मांस व इतर साहित्य असा एकूण ८२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. ताजबाग सोसायटी परिसरात गोमांसाची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी दुकानात मोठ्या प्रमाणात मांस लटकविलेल्या अवस्थेत आढळून आले.

पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत २३० रुपये प्रतिकिलो दराने अंदाजे ८० हजार ५०० रुपये किमतीचे ३५० किलो मांस, एक सुरा आणि मांस मोजण्याचा काटा असा एकूण ८२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक अहवालानुसार हे मांस गोवंशीय असल्याचे स्पष्ट झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

जप्त करण्यात आलेले मांस नाशवंत स्वरूपाचे असल्याने त्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगर परिषद प्रशासनाला पत्राद्वारे कळविण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चैतन्य, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी आणि शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रविंद्र बारड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख गणेश सपकाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

# टीईटी पेपरफुटीची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करा

## दारव्हा युवक काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी ४ जुलै



**दारव्हा :** राज्यातील टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींविरुद्ध तातडीने कायदेशीर पावले उचलावीत, या मागणीसाठी दारव्हा तालुका युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी उपविभागीय अधिकारी, दारव्हा यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या मेहनतीने परीक्षेची तयारी करून परीक्षा दिली; मात्र गैरप्रकारामुळे त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताला धक्का बसला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही युवक काँग्रेसने निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन सादर करताना माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाशराव नवरंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य पंढरीनाथ सिहे, तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल राऊत, नगरसेवक सर्फराज खान, शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मसूद खान यांच्यासह काँग्रेस व युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवनी करंदीकर यांना 'लाइफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र

## 'माझी लेक, माझा अभिमान!': चेन्नई येथील एका दिमाखदार कार्यक्रमात सन्मान

प्रतिनिधी ४ जुलै



**यवतमाळ :** 'लेक लाडकी असते, पण जेव्हा ती कर्तृत्वाने बापाचे नाव उज्ज्वल करते, तेव्हा तो आनंद शब्दांत मांडणे कठीण असते.' गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या लेकीने 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवून यशाचे नवे शिखर गाठले. हा क्षण तांबेकर-करंदीकर कुटुंबीयांसाठी अविस्मरणीय ठरला आहे.

धनंजय तांबेकर यांची कन्या आणि 'हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'या पुस्तकाच्या लेखिका अवनी अथर्व करंदीकर (देवयानी) यांनी चेन्नई येथे 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र (मेरिट सर्टिफिकेट) पटकावून यशाचे नवे शिखर गाठले आहे. अवनी करंदीकर यांना हे सन्मानचिन्ह भारतातील अग्रगण्य लाईफ कोच, मोटिव्हेशनल स्पीकर आणि 'लाईफ बाय डिझाईन'च्या संस्थापक पूजा पुनीत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

प्रतिभावान मार्गदर्शकाच्या हस्ते मिळालेला हा बहुमान अवनीच्या जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करतानाच, इतरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याची तिची जिद्द आज खऱ्या अर्थाने फळाला आली आहे, असे कौतुक सर्वस्तरातून होत आहे.

लेकीच्या या यशाने भारावलेले वडील धनंजय तांबेकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, 'अवनीची मेहनत, शिस्त आणि इतरांना मदत करण्याची वृत्ती आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. यश हे अंतिम ध्येय नसून, ती अधिक जबाबदाऱ्या आणि निरंतर शिकण्याची एक सुरुवात आहे.' अवनीने यापुढील काळातही ज्ञानाच्या जोरावर समाजात एक वेगळी ओळख निर्माण करावी, अशी प्रार्थना करत त्यांनी तिला उत्तम आरोग्य आणि उत्तरोत्तर यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ब्राम्हणगाव उर्दू शाळेत प्रवेशोत्सव

## विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छांनी स्वागत; पुस्तक वाटप

प्रतिनिधी ४ जुलै



**उमरखेड :** जि.प. उच्च प्राथमिक उर्दू शाळा, ब्राम्हणगाव येथे ३० जून रोजी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रवेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात सरपंच परमात्मा गरुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अफरोजखान पठाण, शिक्षणतज्ज्ञ शेख शब्बीर शेख हनीफ तसेच केंद्रप्रमुख शिवाजीराव पवार यांच्या हस्ते इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.


मागील वर्षाच्या तुलनेत यंदा शाळेच्या पटसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याबद्दल केंद्रप्रमुख शिवाजीराव पवार यांनी शाळेच्या शिक्षकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्यामुळे व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक शेख उमर शेख करीम, नसीरखान मोहिमखान पठाण, श्रीमती नुसरत खान शादुल्लाखान पठाण आणि श्रीमती गजाला अंजुम फहीम अहमद यांनी परिश्रम घेतले.

# स्व. सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा होणार

## ना. इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश : जलसंधारण चळवळीला मिळणार नवी प्रेरणा

प्रतिनिधी ४ जुलै





**पुसद :** माजी मुख्यमंत्री तथा जलक्रांतीचे प्रणेते म्हणून ओळख असलेल्या सुधाकरराव नाईक यांच्या २१ ऑगस्ट या जयंतीदिनाला महाराष्ट्र शासनाने 'जलसंधारण दिन' म्हणून घोषित केले आहे. जलसंधारण विभागाने याबाबत परिपत्रक जारी केल्याने राज्यभरातील नाईक समर्थक आणि जलसंधारण क्षेत्रात कार्यरत संघटनांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ही मागणी राज्याचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने लावून धरली होती. जलसंधारण खात्याच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान देत महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सुधाकरराव नाईक यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या जयंतीदिनी 'जलसंधारण दिन' साजरा करण्याची मागणी करण्यात आली होती.

यासंदर्भात इंद्रनील नाईक यांनी १ मे २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले होते. त्यानंतर शासनाने सकारात्मक भूमिका घेत अवघ्या दोन महिन्यांत, ३ जुलै २०२६ रोजी परिपत्रक जारी करून २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून घोषित केला.

या निर्णयामुळे राज्यातील जलसंधारण चळवळीला नवी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट रोजी राज्यभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन करण्यात येणार असून जलसंधारणाबाबत जनजागृतीचे उपक्रमही राबविले जाणार आहेत.

शासनाच्या या निर्णयाचे जलसंधारण क्षेत्रातील कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना आणि सुधाकरराव नाईक यांच्यावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी स्वागत केले आहे. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करत जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा संकल्प यानिमित्ताने व्यक्त केला जात आहे.

# घनकचरा व्यवस्थापन कोलमडले

## घंटागाड्या बंद असल्याने सर्वत्र कचऱ्याचे ढीग : शैलेश कोपरकर यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ४ जुलै



**महागाव :** महागाव नगर पंचायतीची घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे. १ जुलैपासून शहरातील घराघरातील कचरा उचलला जात नसल्याचा आरोप नगरसेवक तथा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश कोपरकर यांनी केला आहे. शहरात एकही घंटागाडी फिरत नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून नागरिकांना दुर्गंधी व अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

कोपरकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात, नागरिकांना स्वच्छतेसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप केला. शहरात डास व माशांचा प्रादुर्भाव वाढल्याने साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि सत्ताधारी यांनी केवळ एक दिवस स्वच्छता अभियानाचे फोटोसेशन केले, मात्र त्यानंतर पुन्हा स्वच्छता व्यवस्था कोलमडल्याचा आरोपही त्यांनी केला. नागरिकांना नियमित सेवा मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याधिकारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याचा आरोप करत, प्रशासनाचे शहर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचा दावाही कोपरकर यांनी केला. नगरपंचायत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे महागाव शहराची दयनीय अवस्था झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकारी व संबंधितांवर कारवाई करावी, शहरातील घंटागाड्या नियमित सुरू करून साचलेला कचरा त्वरित उचलावा, अन्यथा नागरिकांसह तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शैलेश कोपरकर यांनी दिला आहे.

# सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. ४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## सोमवारी अचलपूर येथे निवृत्तीवेतनधारकांचा मेळावा

**अमरावती:** लेखा व कोषागारे विभागातर्फे अचलपूर तालुक्यातील निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी निवृत्तीवेतन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात महाउपलब्धी ॲपद्वारे निवृत्तीवेतनासंबधात माहिती व सेवांची माहिती देण्यात येणार आहे.

सदर मेळावा अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सभागृहात दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या मेळाव्यात निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी निवृत्ती वेतनाबाबत वरीष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ, हे मार्गदर्शन करणार आहेत. मेळाव्याला निवृत्ती वेतनधारक तथा कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवृत्त वेतन कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी केले आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती:** कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शासनाच्या महिला केंद्रित योजनांचा लाभ प्रत्येक पात्र महिलेपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले आहे.

येथील महसूल भवन येथे आयोजित बैठकीत त्यांनी महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी बोलताना श्रीमती रहाटकर यांनी सर्व शासकीय विभागांना एका महिन्याच्या आत आपल्या कार्यालयांमध्ये 'पॉश' म्हणजेच लैंगिक छळ प्रतिबंधक समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. या समित्या स्थापन करून त्याचा सविस्तर अहवाल संबंधित जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या आढावा बैठकीला विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.



प्रवीण कुमार देवरे, वाशिम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी तसेच वन विभागाच्या मुख्य वन संरक्षक जयोती बॅनर्जी, वनसंरक्षक अर्जुना के आर यांच्यासह सर्व प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, प्रशासनामार्फत जिल्ह्यातील सर्व समित्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी येत्या चार महिन्यांचा एक सुनियोजित कार्यक्रम तयार करून राबविण्यात यावा. महिलांविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये पीडित महिलांना तातडीने आणि अत्यंत संवेदनशीलतेने न्याय मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कामाच्या ठिकाणी महिलांसाठी अत्यंत सुरक्षित, भयमुक्त आणि सन्मानजनक वातावरण निर्माण करणे ही सर्वच शासकीय यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे, असेही त्या म्हणाल्या. संकटकाळात सापडलेल्या किंवा पीडित महिलांना एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर आणि मानसिक मदत देणाऱ्या 'वन स्टॉप सेंटर' या योजनेबाबत जनजागृती करण्यात यावी, तसेच तेथील सेवांची वेळोवेळी तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. याशिवाय, ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी महिला बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तूंना बाजारात योग्य स्थान मिळावे आणि या वस्तू आपल्या जिल्ह्याची एक स्वतंत्र ओळख 'ब्रॅन्ड ' म्हणून पुढे याव्यात, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्रीमती रहाटकर यांनी यावेळी केले.

# गोरक्षण संस्थेला वध्यंत्व शिबीराचा लाभ

### ◆ नरदोडा येथील शासकीय पशु वैद्यकीय चमूचे सहकार्य

प्रतिनिधी ४ जुलै



**दर्यापूर :** महाराष्ट्र शासनाच्या पशुवैद्यकीय कार्यालयाद्वारे तालुक्यातील सर्वच केंद्रावर तथा गोरक्षण स्थळी वेळोवेळी विविध मोफत शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते . या नुसार दर्यापूर तालुक्यातील नरदोडा या केंद्रा अंतर्गत येत असलेल्या गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर नुकतेच वंध्यत्व तपासणी तथा निवारण शिबिर संपन्न झाले . या मध्ये जवळपास शंभर गायींची तपासणी करण्यात आली . सुविधा व संगोपन यासाठी तपासणी अहवाला नुसार गोरक्षण संस्थेस काळजी व औषध उपचार याबाबत योग्य सुचना देण्यात आल्या . संपूर्णपणे मोफत राबविण्यात आलेल्या गोवंश संगोपनाच्या या महत्वपूर्ण सेवा शिबिरात पशुसंवर्धन दर्यापूर विभाग सहाय्यक आयुक्त डॉ प्रतिक बोडखे यांचे प्रमुख मार्गदर्शनात नरदोडा उपकेंद्राचे पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ वृषभ मानकर , परीचर अंकुश माहुलकर यांनी कार्य पूर्तता केली . याप्रसंगी सेवानिवृत्त पशुसंवर्धन आयुक्त डॉ दिपक उफाळे यांचा शिबीरातील उत्स्फूर्त सहभाग मोलाचा तथा प्रेरणादायी ठरला . गोरक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे संचालक प्रा . गजानन भारसाकळे यांनी शासनाच्या पशुसंवर्धन कार्यालयाचे तथा सर्व डॉक्टर सेवार्थी यांचे आभार व्यक्त केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांचे सह दैनंदिन गोसेवक अंकुश घरडे, संतोष गवई, श्रीकृष्ण पोटे व ज्ञानेश्वर गवई यांचेही यथोचित सहकार्य लाभले .

# विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचा तीव्र आक्रोश!

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती :** देशभरात NEET परीक्षेतील गोंधळ, विविध प्रवेशपूर्व पात्रता परीक्षांमधील गैरव्यवहार आणि आता TET परीक्षेचा पेपर फुटल्याच्या गंभीर प्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू असल्याचा संताप व्यक्त करत, महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अमरावती जिल्हा



युवक काँग्रेसच्या वतीने अमरावती येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. 'पेपर फुटी थांबवा... विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ बंद करा!' अशी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश सचिव व प्रवक्ते अक्षय राऊत, नगरसेवक व तालुकाध्यक्ष वैभव वानखडे, प्रदेश सचिव उत्कर्ष देशमुख, प्रदेश सचिव परीक्षित जगताप, प्रदेश महासचिव नितेश वानखेड़े, सागर कलाने, नितीन काळे, मयूर देशमुख, पियुष मालवीय, सागर गोडबोले, गौरव चौधरी यांच्यासह शेकडो युवक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि पेपरफुटीच्या साखळीला कायमचा आळा घालण्यासाठी युवक काँग्रेसचा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील.

# पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात कृषी दिन साजरा

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्राच्या शेतीला आधुनिकतेची दिशा देणारे, हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे यांच्या हस्ते माजी कृषिमंत्री स्व.



वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालय परिसरात प्राचार्य व रा.से.यो.स्वयंसेवक यांच्या हस्ते बेल, आंबा, वड, पिंपळ या वृक्षांची लागवड करण्यात आली. डॉ. ठाकरे यांनी कृषी संजीवनी सप्ताहाचे महत्त्व सांगून स्व. वसंतरावजी नाईक यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

कृषी दिनानिमित्त ७ व्या सत्रातील विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन विविध कार्यक्रमाचे आयोजन देखिल केले तसेच गावामध्ये कृषीदिंडी काढून, वृक्षारोपण करून कृषी दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम उपप्राचार्य नितेश चौधरी व महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रद्धा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मार्ट (टिओडी) मीटर शंका निरसन मेळाव्यात ग्राहकांचे समाधान

### मेळाव्यातून महावितरणने साधला ग्राहकांशी साधला संवाद

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती:** महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी व जनजागृतीसाठी परिमंडळात आयोजित मेळाव्याला वीज ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मेळाव्यात आलेल्या वीज ग्राहकांना चेक मीटर व्दारे प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून माहिती देण्यात आल्याने वीज ग्राहकांनी समाधान व्यक्त केले.

मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंते दिपक देवहाते (अमरावती), रूपेश टेंभुर्णे (यवतमाळ) यांच्या पुढाकारातून परिमंडळात आयोजित मेळाव्याला ८४७ वीज ग्राहकांनी भेट देत स्मार्ट मीटर विषयी माहिती जाणून



घेतली. महावितरण अमरावती परिमंडळात ३० जून ला उपविभाग निहाय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात काळानुरूप आणि वीजमीटरच्या तंत्रज्ञानात होत गेलेल्या बदलांची माहिती दिली. जुने फिरणारे चकतीच्या मीटर पासून ते इलेक्ट्रॉनिक मीटर, रेडीओ फ्रीक्वेन्सी मीटर पर्यंतचा होत गेलेला ग्राहकाभिमूख बदलांचा इतिहास सांगत स्मार्ट मीटर अधिक अचूक असून वीजवापर आहे तेवढाच नोंदवला जातो, त्यामुळे बिलींगबाबत असलेल्या तक्रारी कश्या कमी झाल्यात याबाबत माहिती देण्यात आली. स्मार्ट मीटर स्वताच मीटर वाटन करत असल्याने रिडींग मध्ये होणारा मानवी हस्तक्षेप टाळून नेमके वीज वापराचे बील दिले जाते.त्यामुळे बिलाविषयीच्या तक्रारी कमी झाल्याची माहिती देण्यात आली.

# ५८ तक्रारींवर राष्ट्रीय महिला आयोगाची जनसुनावणी

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती:** राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जनसुनावणी घेण्यात आली. यात ५८ तक्रारी विचारात घेण्यात आल्या. विशेष म्हणजे उपस्थित सर्व तक्रारदारांशी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्तिश: भेट दिली आणि त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना निर्देश दिले.

जनसुनावणीच्या वेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासह आयोगाचे अधिकारी उपस्थित होते.

जनसुनावणीसाठी आलेल्यांची नोंदणी करून त्यांना टोकन क्रमांक देण्यात आले.



नियोजन भवनात दोन पॅनेल करून उपस्थित महिलांच्या तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. त्यानंतर संवेदनशील प्रकरणी आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रहाटकर यांनी तक्रारदारांशी व्यक्तीश: संवाद साधला. जनसुनावणीत प्रामुख्याने पॉश, नातेसंबंधातील तडजोडीची प्रकरणे, घरगुती हिंसाचार आदी प्रकरणे समोर आली. काही प्रकरणी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेऊन श्रीमती रहाटकर यांनी पोलिसांना तात्काळ गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिले. तसेच त्यांची प्रत सादर करण्यास सांगितले. तडजोडीच्या प्रकरणात काहींनी एकत्र राहण्याचे मान्य केले. जनसुनावणीत आली प्रकरणे ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच या प्रकरणांचा मागोवा घेतला जाणार आहे. यातून पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. गुन्हा नोंदविल्यानंतर चार्जशिट दाखल करण्यापर्यंत प्रकरणांचा पाठपुरावा केला जाणार आहे. आयोगाच्या आखत्यारीत येऊ शकणार नाही, अशा प्रकरणी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यांच्या तक्रारी योग्य प्राधिकरणाकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला आयोगाच्या राज्यातील विविध भागात जनसुनावण्यामुळे महिलांसाठी असलेल्या यंत्रणांबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत असल्याचे श्रीमती राहटकर यांनी सांगितले.

# लाखो तरुणांना कंपन्या ठेवतात 'स्टँड बाय' वर ?

### सिलेक्शननंतरही जॉइनिंगला टाळाटाळ; शासनाच्या नियमांना मोठ्या कंपन्यांकडून हरताळ

प्रतिनिधी ४ जुलै

**दर्यापूर :** 'तुमची निवड झाली आहे, पण जॉइनिंग लेटर नंतर पाठवू' - हे वाक्य ऐकून आनंदलेले लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण आजही घरात बसून आहेत. कॅम्पस इंटरव्ह्यू, जॉब फेअर आणि ऑनलाइन भरती प्रक्रियेत निवड झाल्यानंतरही मोठ्या कंपन्या उमेदवारांना महिनोन्महिने 'स्टँड बाय' वर ठेवत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शासन म्हणते बेरोजगारांना दिलासा दिला हजारो तरुणांना नोकऱ्या दिल्या मात्र वास्तव वेगळेच आहे, राज्यातील विविध अभियांत्रिकी, आयटीआय, पदवीधर झालेल्या तरुणांच्या मुलाखती घेऊन कंपन्या 'ऑफर लेटर' देतात. पण प्रत्यक्ष रुजू होण्याची तारीख मात्र सांगितली जात नाही. 'प्रोजेक्ट आला की बोलावू', 'क्लायंटची मंजुरी बाकी आहे', 'बजेट फायनल झाले नाही' अशी कारणे देऊन ३ ते ६ महिने, कधी कधी दोन वर्ष उमेदवारांना वाट पाहायला लावली जाते. या काळात उमेदवार इतर नोकरीसाठी प्रयत्नही करू शकत नाही, कारण त्याच्याकडे कंपनीचे ऑफर लेटर असते. विदर्भातील अमरावती, अकोला, नागपूर येथील अनेक तरुणांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, नामांकित आयटी आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपन्यांनी कॅम्पसमधून निवड केली. करारनामा सुद्धा झाला, ऑफर लेटर मिळून ८ महिने झाले, पण अजून जॉइनिंग नाही. एचआरला फोन केला की ठपुढच्या बॅचमध्ये नक्कीठ असे उत्तर मिळते. विशेष म्हणजे, महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाच्या 'रोजगार मेळावा' धोरणानुसार निवड झालेल्या उमेदवाराला ४५ दिवसांत रुजू करून घेणे बंधनकारक आहे.

# महिला शेतकरी विधेयक म्हणजे महिलांच्या श्रमाला आणि हक्काला मिळालेला खरा सन्मान - आ. सुलभा खोडके

### विधानसभेत 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकावर चर्चा

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती :** महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या वतीने अनेक कायदे करून विविध योजना राबविण्यात आल्या. या योजनांतून आज अनेक महिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे, पण शेतकऱ्यांसोबत खांद्याला खांद्या लावून काम करणाऱ्या महिला शेतमजुरांना कुठलीही ओळख अथवा न्याय मिळत नव्हता. राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी शासनाचे महिला शेतकरी विधेयक म्हणजे महिलांच्या श्रमाला आणि हक्काला मिळालेला खरा सन्मान आहे. या विधेयकातून शेतकरी महिलांच्या जिद्द , कर्तृत्व , नेतृत्व आणि कृषी क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाचे दर्शन घडत असल्याचे प्रतिपादन अमरावतीच्या आमदार - सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी केले.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील विधानसभेतील कामकाजादरम्यान महाराष्ट्र 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ वर चर्चा करतांना आ.सुलभा खोडके यांनी सांगितले कि, महिला शेतमजूर हा खऱ्या अर्थाने शेतकरी कुटुंबाचा कणा असून पेरणीपासून ते कापणी पर्यंत सर्वच कामे महिला शेतकरी करीत असतात. पिकांच्या लागवडीपासून ते काढणी पर्यंत व थेट बाजारपेठ पर्यंत शेतमाल





पोहोचविण्यासाठी महिला शेती मजुरांचे मोठे परिश्रम लागलेले असतात. पण आजपर्यंत शेतकरी संज्ञेमध्ये त्यांच्या श्रमाला कधी ओळख मिळाली नाही. विदर्भातील शेतकरी आत्महत्या काळात महिलांनी कुटुंबाला आधार देऊन पुढे नेण्याचे काम केले. अनेक महिला या रासायनिक शेती ऐवजी सेंद्रिय शेतीला महत्व देत जुने घराच्या बीजांचे संगोपण करून आपल्या शेतात बीजारोपण करतात. आणि शासनाच्या नैसर्गिक शेतीचे महत्व अधोरेखित करतात. दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय , पशुपालन , कुक्कुटपालन सारख्या कृषी पूरक व्यवसायातही महिला शेतमजुर ह्या जवळपास सगळी कामे करत असतात. मात्र त्यांच्या श्रमाला कुठेही सन्मान मिळत नाही. महाराष्ट्र शासनाने महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आणून कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या या महिला शेतमजुरांना शेतकरी म्हणून मान्यता देण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून केला असल्याचे गौरवोद्गार आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी विधानसभेतून व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाने विधानसभेत 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ अंतर्गत शेतजमीन नावावर नसली तरी, शेती किंवा संबंधित कामात राबणाऱ्या प्रत्येक महिलेला 'महिला शेतकरी' म्हणून कायदेशीर दर्जा आणि प्रमाणपत्र दिले जाईल, ही एक चांगली बाब असून याबाबतची ग्रामपंचायत पातळीवरील प्रक्रिया अत्यंत सुलभ व सोयीची करण्यात यावी, जाचक कागद पत्रांची सक्ती करून नये तसेच महिलांना थेट बँक कर्ज, शासकीय अनुदाने आणि कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. ,

# पॉश कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीने तक्रार निवारणासह जनजागृतीवर भर द्यावा

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती:** मातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व हा तिहेरी संगम सुरक्षित रहावा, यासाठी पॉश कायद्याची अंमलबजावणी चोख व्हावी, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक कामाचे ठिकाण हे सुरक्षितता, सन्मान आणि समान संधी देणारे असले पाहिजे. त्यादृष्टीने पॉश कायद्यांतर्गत आस्थापनांमध्ये स्थापित तक्रार निवारण समित्यांनी अधिक जागरूक राहून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच याबाबत जनजागृती करण्यावर भर द्यावा, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी आज येथे केले. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण (पॉश ॲक्ट) कायद्याबाबत कार्यशाळा श्रीमती





रहाटकर यांच्या उपस्थितीत नियोजन भवनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी आशिष येरेकर, यवतमाळ जिल्हाधिकारी विकास मीना, बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे, विधी सचिव श्री. सहारे, महिला आयोगाचे उपसंचालक रामावतार सिंह, नंदिता प्रधान आदी उपस्थित होते. श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, महाराष्ट्र हे संवेदनशील राज्य आहे. महिलांसाठी प्रत्येक कामाचे ठिकाण हे सुरक्षितता, सन्मान आणि समान संधी देणारे असले पाहिजे. महिलांना सुरक्षित आणि भेदभावमुक्त कामाचे वातावरण मिळावे यासाठी 'पॉश'कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याचे नियमित ऑडिट होण्याची गरज आहे. राष्ट्रीय महिला आयोगामार्फत महिलांच्या विविध विषयांवर वेगवेगळे संशोधन सातत्याने सुरू असतात. या संशोधनातून स्त्रियांसाठी आवश्यक कायदे, त्यांचे अधिकार यावर निर्णय घेण्यास मदत होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार, दि. ४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com





तुकाराम मुंढे यांच्या,
कारवाईची धास्ती, उतरली मस्ती,
मात्र वाशीमच्या अधिकाऱ्यांच्या,
कारवाई कमी, वसुली जास्ती!
दिखावा म्हणून कारवाया डमी, मॅनेजची हमी, अन्न व औषध प्रशासन विभाग निकामी

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
तुकाराम मुंढे साहेबांचा...
शिस्त, कडक नियम व कायद्या, भ्रष्टअधिकाऱ्यांचा वसुलीचा फायदा!
*मोठ्या माफियांना सूट, छोट्या दुकानदाराकडून लूट * छोटे - मोठे अशी फूट

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
तुकाराम मुंढे साहेब...
औषध प्रशासनाचा मोरक्या, वसुलीसाठी घालतो गिरक्या!
* एकही ठोस कारवाई नाही, फक्त वसुलीची घाई...

## बातम्या खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट...

# अन्न व औषध प्रशासनाला आली जाग, कारवाईसाठी भागम भाग !

## वाशीममध्ये कारवाईचा धडाका; हॉटेल्सचे परवाने निलंबित, दोघांना सुधारणा नोटीस

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अन्न व प्रशासन विभागाची वाशीम जिल्ह्यात एकही कारवाई नसल्याचे व निव्वळ वसुली सुरू असल्याची वृत्तमालिका सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरल्यानंतर वसुलीसाठी जागृत असलेल्या व कारवाईसाठी निद्रावस्थेत असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाला जाग आली असून कारवाईसाठी आता भागम भाग सुरू आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानव्ये वाशीम शहरात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी हॉटेल्सची धडक तपासणी मोहीम राबवली. या धडक कारवाईमुळे विनापरवाना व अस्वच्छतेबाबत निष्काळजीपणा बाळगणाऱ्या हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत.








या मोहिमेदरम्यान वाशीम येथील ३ प्रमुख हॉटेल्सची कसून तपासणी करण्यात आली. यामध्ये अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी 'साई ढाबा' ' यांचे लायसेन्स (परवाने) तातडीने निलंबित (एल्जह्) करण्यात आले आहेत. तसेच, 'हॉटेल गणेश' आणि अकोला नाका येथील 'हॉटेल चिंतामणी येथे तपासणी दरम्यान काही त्रुटी आढळून आल्याने, त्यांना नियमांचे पालन करण्यासाठी आणि आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी प्रशासनातर्फे 'सुधारणा नोटीस' बजावण्यात आली आहे.

'नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही. आयुक्तच्या आदेशानुसार ही मोहीम अशीच तीव्रपणे सुरू राहील,' अशी माहिती अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली आहे.हॉटेल व्यवसायिकांनी ग्राहकांना दर्जेदार व स्वच्छ अन्नच वाढावे, अन्यथा यापुढील काळातही अशीच कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. महाराष्ट्रभर अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ, अवैध गुटखा विक्री आणि मेडिकलमधील अनियमिततेविरोधात तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यभरात कारवायाचा धडाका सुरू आहे. मात्र भ्रष्टाचाराने बरबटून पोखरून वाळवी लागलेल्या वाशीमच्या अन्न व प्रशासन विभागाच्या कारवाया कमी वसुलीच जास्त सुरू आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत औषध प्रशासन विभागाचा मोरक्या दलालामार्फत वसुलीसाठी बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात गिरक्या घालत आहे.

## थोडक्यात

### विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला गती द्या-जिल्हाधिकारी



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांनिहाय गणनापत्र वितरण व संगणकीकरणाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. मोहिमेतील सर्व कामे विहित मुदतीत, अचूक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत प्रत्येक सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील गणनापत्र वितरण, घरभेटीद्वारे सुरू असलेली मतदार पडताळणी, संगणकीकरणाची प्रगती, प्रलंबित बाबी तसेच आगामी नियोजनाचा विधानसभा मतदारसंघनिहाय सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या भागांमध्ये कामाची गती अपेक्षेपेक्षा कमी आहे, तेथे विशेष नियोजन करून तातडीने प्रगती वाढविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. गणनापत्रांचे वेळेत वितरण आणि त्यानंतर तातडीने संगणकीकरण पूर्ण करण्यावर भर देत त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घेऊन प्रलंबित कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करावीत, असेही सांगितले.विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पर्यवेक्षक आणि संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून मोहिमेला अधिक गती द्यावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, सर्व सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, निवडणूक शाखेचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पाचव्या मजल्यावरून खाली पडून मजुराचा दुर्दैवी मृत्यू !

### *कारंजा येथील विद्याभारती कॉलेजमधील घटना *कामगाराच्या सुरक्षिततेचे प्रश्न ऐरणीवर, जबाबदार कोण

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहरातील नामांकित विद्याभारती कॉलेज परिसरात काल सायंकाळी पाचच्या सुमारास कॉलेजच्या इमारतीचे बांधकाम सुरू असताना पश्चिम बंगाल येथील मजुराचा पाचव्या मजल्यावरून खाली पडून गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला झाला.

सविस्तर माहिती अशी की विद्याभारती कॉलेजचे बांधकाम सुरू असताना एक मजूर पाचव्या मजल्यावर खाली पडल्याची माहिती तेथील एका नागरिकाने आई एकवीरा रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक विनोद खोड यांना फोन द्वारे दिली असता त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जख्मी इसमाला कारंजा उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले.त्याचे नाव सुजल दिलीप सदय वय १८ वर्ष रा.राणाघाट वेस्ट बंगाल चा रहिवासी आहे.कारंजा तेथील वैद्यकीय अधिकाराने प्रथमोपचार करून पुढील




उपचारासाठी अमरावती येथे रेफर केले.रुग्णवाहिके मध्ये अमरावतीला जात असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.या घटनेमुळे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माहितीनुसार, संबंधित मजूर उंचावर काम करत असताना अचानक तोल जाऊन खाली जमिनीवर कोसळला.मात्र तो नेमका कशामुळे पडला, कामगाराचा सुरक्षा विमा काढला होता का ? सुरक्षा साधनांचा वापर केला होता का सेफ्टी बेल्ट, हेल्मेट किंवा इतर आवश्यक संरक्षण साहित्य उपलब्ध होते का? बांधकामस्थळी सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते का, संबंधित कंत्राटदाराने कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या होत्या का, तसेच कामगार कायद्यांचे पालन झाले होते का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.कामगार संघटनांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.संबंधित कंत्राटदार, कॉलेज प्रशासन तसेच इतर जबाबदार व्यक्तींची चौकशी करून कारवाई करण्यात यावी.सदर परवाना हा पाच मजली इमारतीचा होता त्याचीही चौकशी करणे महत्त्वाचे आहे.सुरक्षिततेचे साधन काय आहे.कारण ही बिल्डिंग विद्यार्थ्यांसाठी बांधल्या जात असल्यामुळे सर्व प्रिकॉशन व सर्व सुविधा युक्त इमारत होणे आवश्यक आहे.त्यासाठी सर्व बाबीची चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे आणि अशी चौकशी व्हावी अशी जनसामान्यात चर्चा आहे.

## झोलेबाबा विद्यालयात प्रवेशोत्सव

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, पिंप्री (अवगण) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी मागील वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि आनंददायी वातावरणात जंगी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव तथा



प्राचार्य सुनिलजी सपकाळ साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाबरोबरच विविध शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या प्रवेशोत्सवामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साह, आनंद आणि प्रेरणादायी वातावरणात झाली.

## न.प. सदार पटेल विद्यामंदिरमध्ये प्रवेशोत्सव !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्थानिक न. प. सरदार पटेल विद्यामंदिर, वाशिम येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका निमके मॅडम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषदेचे शिक्षण सभापती सन्माननीय कुणाल हेडा, प्रशासन अधिकारी मिटकरी सर तसेच नगर परिषद सदस्य खंडाळकर उपस्थित होते.

कु. प्राची आढागळे व विद्यार्थिनींच्या प्रसंगीक नृत्याने सुंदर वातावरण तयार झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. वावरे सर यांनी केले. मार्गदर्शन करताना शिक्षण सभापती कुणाल हेडा यांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. प्रशासन अधिकारी नंदकिशोर मिटकरी सर यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी




शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अ. सू. इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. यादव सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी झामरे मॅडम, कांबळे सर, खंडारे मॅडम, घूगरे मॅडम, डाखोरे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सर्व सदस्य तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## भ्रष्टाचारी घेतात कष्ट, पुरावे करतात नष्ट!

### रोपवन घोटाळा प्रकरण तापले; पुरावे नष्ट करण्याच्या हालचालींचा संशय

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शेंदुरजना अढाव मानोरा तालुक्यातील गिरोली वनवर्तुळांतर्गत सावरगाव कान्होबा वनबिटातील कक्ष क्रमांक १३८ मधील कथित रोपवन घोटाळा आता नव्या वळणावर पोहोचला असून, या प्रकरणातील पुरावे नष्ट करण्यासाठी संबंधितांकडून आग लावण्याचा कट रचला जाऊशकतो, असा गंभीर संशय कारखेडा येथील जागरूक नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रदीप मोहनराव सोळंके यांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भात त्यांनी वन प्रशासनाला लेखी निवेदन देत तातडीने खबरदारी घेण्याची मागणी केली आहे.



सोळंके यांनी दिलेल्या माहिती नुसार, गिरोली वनवर्तुळातील सावरगाव कान्होबा वनबिटाच्च्या कक्ष क्र. १२८ मध्ये सन २०२२-२३ मध्ये भरिव वनीकरण योजनेअंतर्गत २० हेक्टर क्षेत्रावर मिश्र रोपवन करण्यात आल्याची नोंद असून त्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. ११ एप्रिल २०२४ रोजी काढलेल्या छायाचित्रांमध्ये महाराष्ट्र शासन, वाशिम वनविभागाचा अधिकृत फलक दिसत असला तरी प्रत्यक्ष पाहणीत परिसरात अत्यल्प वाळलेली रोपे आढळून आली असून बहुतांश क्षेत्र गवताळ व मोकळे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात लावल्याचा बाबा करण्यात आलेली रोपे प्रत्यक्षात दिसूनन आल्याने कागदी रोपवन' घोटाळ्याची शक्यता व्यक्त नष्ट करण्यात आली आहे. तसेच तक्रारीनंतर पुरावे करण्यासाठी कोरड्या गवताला जाणीवपूर्वक आगलातून रोपे जळून गेली असा दावा केला जाऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली.

**जीपीएसद्वारे पुरावे जतन**

प्रकरण अधिक गंभीर बनवणारी बाब म्हणजे या कथित घोटाळ्याबाबत सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक पर्यावरणप्रेमीनी मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून तसेच यावर्षी एप्रिल आणि मे महिन्यात संबंधित क्षेत्राचे जीपीएस लोकेशनसह फोटो व व्हिडिओ चित्रीकरण करून नोंदी जतन केल्या आहेत.

## नगरसेवकाचा भाजपला घरचा आहेर, कचरा टाकला न.प.च्या बाहेर !

### *भ्रष्टाचाराचा करा निचरा, अन्यथा न.प. मध्येच टाकू कचरा *भाजपा नगरसेवक सतिश (गल्ला) वानखेडे यांचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहरातील प्रभागात कचरा गाड्या येत नाहीत, सफाई कर्मचाऱ्यांचा ठेकेदार पगार देत नाही, कचऱ्याच्या निवेदेमध्येच भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या भाजप नगरसेवकाने चक्क नगर परिषदेत कचरा आणून टाकला आहे.तसेच या कचऱ्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य परल्याचं आरोपही भाजपा नगरसेवक सतिश उर्फ गल्ला वानखेडे यांनी केला आहे. सत्ताधारी नगरसेवकांने कचरा नगरपालिके मध्ये आणून टाकल्याने हा विषय चर्चेचा बनला आहे.





वाशिम शहरातील प्रत्येक प्रभागात कचरा गाड्या वेळेवर जात नसल्याने शहरात कचऱ्याचे साम्राज्य पाहायला मिळत असून याकडे नगर परिषद प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यवर परिणाम होत असल्याचा आरोप करत प्रभाग क्रमांक आठ चे नगरसेवक सतीश वानखेडे यांनी चक्क कचरा भरून नगर पालिकेत आणि अधिकाऱ्यांच्या दालनात आणून टाकल्याने नगर पालिकेत सर्वत्र दुर्गंधी पसरली होती.

यापुढे शहरातील कचरा व्यस्थापन व्यस्थित न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी भाजप नगरसेवक सतीश वानखेडे यांनी दिला आहे.तर दुसरीकडे सत्ताधारी पक्षातील नगरसेवकच आंदोलन करत असल्याने भाजपच्या अंतर्गत गोटात सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

तर या संदर्भात वाशीम नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण यांना विचारले असता, त्यांच्या प्रभागातील कचरा गाडीचे काम निघाल्याने २ ते ३ दिवसांपासून ती बंद होती .त्यामुळे कचरा गाडी प्रभागात जात नव्हती.बस इतकाच नगरसेवकाचा रोष होतं. बाकी सर्व गाड्या व्यवस्थित सुरू असल्याचं आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण यांनी सांगितले.

## ग्रामीण विकासासाठी सर्वांनी लोकसहभागातून पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक असून, रोजगारनिर्मिती, शाश्वत उपजीविका आणि लोकसहभागाच्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण विकास साधणे ही काळाची गरज आहे. विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी (ग्रामीण) अधिनियम-२०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ वेळेत पोहोचविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

ग्रामपंचायत कळंबा महाली येथील महादेव मंदिर परिसरात दि. २ जुलै रोजी जिल्हाधिकारी योगेश



कुंभेजकर यांच्या शुभहस्ते केंद्र शासनाच्या विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी (ग्रामीण) अधिनियम-२०२५ योजनेचा जिल्ह्यात शुभारंभ करण्यात आला.यावेळी ते बोलत होते.यावेळी उपजिल्हाधिकारी रोहयो संजय नागटिळक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, तहसीलदार निलेश पळसकर, गटविकास अधिकारी रविंद्र सोनवणे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. ४ जुलै २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## ब्लेडने हाताची नस कापण्याचा प्रयत्न

**खामगाव:** शहरातील चांदमारी परिसरात एका युवकाने ब्लेडने स्वतःच्या हातावर वार करून स्वतःला जखमी केल्याची घटना रात्री घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गजानन मोहन शिंदे असे जखमी युवकाचे नाव असून, जखमी अवस्थेत त्याला त्याच्या आईने तातडीने महात्मा ज्योतिबा फुले सामान्य रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तत्काळ उपचार करून रक्तस्त्राव थांबविला. प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्याला घरी जाण्याची परवानगी देण्यात आली. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, घटनेची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू असल्याचे समजते.

# जळगाव जामोद येथे अवैध गुटखा विक्री विरोधात शिवसेनेचा आक्रमक पवित्रा

### अन्न व औषध प्रशासनाला दिला १५ दिवसांचा इशारा...

प्रतिनिधी ४ जुलै

**जळगाव जामोद:** शहरात सुरू असलेल्या अवैध गुटखा तस्करी आणि विक्रीवर तातडीने बंदी घालावी, या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) बुलढाणा जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक उपायुक्त पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी या गंभीर प्रकाराबाबत सविस्तर निवेदन सादर करून, १५ दिवसांत गुटखा माफिया आणि भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. जळगाव जामोद शहर आणि परिसरात बंदी असलेल्या अवैध गुटख्याची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकरणी बुलढाणा जिल्हा शिवसेनेने आक्रमक पवित्रा घेत अन्न व औषध प्रशासन विभागाला कारवाईचा इशारा दिला आहे. शिवसेना उबाठा चे जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी दिलेल्या निवेदनानुसार, शहरात काही राजकीय नेत्यांच्या वरदहस्तामुळे दररोज लाखो रुपयांचा अवैध गुटखा मध्य प्रदेशातील बुरहानपूरमधून जळगाव जामोदमध्ये आणला जातो. बोलेरो पिकअप वाहनांद्वारे हा गुटखा शहरात आणून नंतर दुचाकी व ऑटोच्या माध्यमातून छुप्या पद्धतीने त्याची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. सीमावर्ती भाग आणि डोंगराळ रस्ते असल्याचा फायदा घेत तस्कर सर्रास गुटख्याची वाहतूक करत आहेत. या भागात आरटीओ चेकपोस्ट किंवा पोलिसांचा पहारा नसल्याने तस्करीला अधिकच ऊत आला आहे. स्थानिक किराणा दुकानांमध्ये भेसळयुक्त मालाचीही विक्री होत असून, आजवर यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत शिवसेना (उबाठा )आक्रमक झाली आहे. येत्या १५ दिवसांच्या आत गुटखा माफिया आणि भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई न केल्यास, बुलढाणा जिल्हा शिवसेनेच्या वतीने संबंधित कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शिवसेना )उबाठा) गटाचे बुलढाणा जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त, मुंबई आणि स्थानिक प्रसारमाध्यमांनाही देण्यात आल्या आहेत. आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; चालकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ जुलै

**खामगाव:** शेगाव-वरवट रोडवरील भोनगाव फाटा परिसरात अज्ञात भरधाव वाहनाने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने ५५ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला,

माहितीनुसार, राजू श्रीकृष्ण मेहेंगे (५५) रा. आस्वाद, ता. संग्रामपूर हे रात्री सुमारे ११ वाजता त्यांच्या हिरो होंडा दुचाकी (क्र. एमएच ३० क्यू ४९६१) वरून शेगावहून वरवट कडे जात होते. भोनगाव फाटा परिसरात अज्ञात वाहनाने भरधाव वेगात व निष्काळजीपणे त्यांच्या दुचाकीला समोरून धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचे सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी मयताचे पुत्र विशाल राजू मेहेंगे यांच्या फिर्यादीवरून शेगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालका विरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत. गत काही दिवसांपासून शेगाव-वरवट बकाल रोडवर अपघातांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शिवसेनेचा उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांना घेराव

### निकृष्ट सोयाबीन बियाणे, युरिया व इतर खतांची साठवणूक करून चढ्याभावाने विक्री करणाऱ्या दुकानदार कारवाईची मागणी

प्रतिनिधी ४ जुलै

**खामगाव:** खामगाव तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या रवी उन्नती कंपनीच्या सोयाबीन बियाण्यामुळे, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर तसेंच युरिया व इतर खतांची साठवणूक करून चळ्या भावाने विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर कारवाई करण्याबाबत शिवसेना आक्रमक झाली असून उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला. निकृष्ट बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर तातडीने कारवाई करून बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

चितोडा अंबिकापूर येथील शेतकरी सोपान अंबादास नागे यांनी उपविभागीय कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी रवी उन्नती या वाणाचे २५ किलोच्या पाच बॅगा खामगाव येथील सरकी लाईनमधील विक्रेत्याकडून ७ मे २०२६ रोजी खरेदी केल्या होत्या. त्यानंतर २३ जून २०२६ रोजी गट क्रमांक १८३ मधील शेतात सर्व नियमांचे पालन करून पेरणी करण्यात आली. मात्र पेरणीनंतर आठ दिवस उलटूनही बियाण्याची उगवण अत्यंत कमी झाली किंवा अनेक ठिकाणी अजिबात झाली नसल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

तक्रारीसोबत खरेदीचे बिल, बियाण्याच्या रिकाम्या पिशव्या व इतर आवश्यक कागदपत्रेही कृषी विभागाकडे सादर करण्यात आली आहेत. संबंधित शेताची तातडीने पाहणी करून पंचनामा करण्यात यावा, दोषी बियाणे कंपनी व विक्रेत्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत असताना प्रशासनाने केवळ कागदी कार्यवाही न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला.

कृषी विभागाने तक्रारीची दखल घेत संबंधित शेताची पाहणी करून आवश्यक अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येईल, तसेच नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी शिष्टमंडळाला दिले. यावेळी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल अंधारे, उपजिल्हाप्रमुख गजानन धोरण, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शहर प्रमुख चेतन ठोंबरे, युवा सेना शहर प्रमुख राहुल कळमकार, उपशहर प्रमुख भाऊ बीडकर, करण छापरवाल, श्याम गायकवाड, आशिष लांडगे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

## नाफेडचा तूर चारणाऱ्या दोघांना अटक; २.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ४ जुलै

**खामगाव:** शेगाव शहरातील श्रीराम इस्टेट परिसरातील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामा चे कुलूप तोडून नाफेडची १३ क्विंटल तूर चोरी करणाऱ्या दोघांना शेगाव शहर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेली तूर, गुन्ह्यात वापरलेले वाहन आणि बारदाणा, असा एकूण २ लाख ६५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२८ जून रोजी गोदामातून तुरीचे २६ कट्टे चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी दि. १ जुलै रोजी तक्रार दाखल झाल्यानंतर शेगाव शहर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरू केला. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करताना (एमएच-०४-जीसी-३४३०) हे मालवाहू वाहन संशयित असल्याचे निष्पन्न झाले. त्याआधारे पोलिसांनी विजय राधेश्याम अग्रवाल (रा. बालाजी फैल, शेगाव) व शेख उमर शेख जमीर (रा. आळसणा) या दोघांना दि. २ जुलै रोजी अटक केली. तपासादरम्यान आरोपींकडून चोरीस गेलेली १३ क्विंटल तूर (किंमत १ लाख १४ हजार ४०० रुपये), गुन्ह्यात वापरलेले मालवाहू वाहन (किंमत १ लाख ५० हजार रुपये) तसेच नाफेडचे स्टेन्सिल असलेले १५ ज्यूट बारदाण्याचे कट्टे (किंमत १ हजार ५०० रुपये) असा एकूण २ लाख ६५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक पीयूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील व पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. कारवाईत पोलिस उपनिरीक्षक कुणाल जाधव, पोलिस अंमलदार संतोष गवई, गजानन वाघमारे, गणेश वाकेकर, जितेंद्र झाडोकार, प्रकाश गव्हांदे तसेच राजू आडवे यांनी सहभाग घेतला.

# भरधाव बोलेरो पिक अपच्या जबर धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

### बैलगाडी वरील धूरकऱ्याचा उजवा पाय तूटून बैल ठार; एक जण गंभीर जखमी

प्रतिनिधी ४ जुलै

**मलकापुर:** बोदवड रोडवरील सालीपुरा फाट्यानजीक काल दि. १ जुलै २६ रोजी रात्री ९ वा. दरम्यान भरधाव बोलेरो पिकअपने दुचाकीस पाठीमागून जबर धडक दिल्याने दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर याच पिकअप चालकाने घटनास्थळावरून पोबारा करून त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून जांबुळधाबा नजीक बैलगाडी ला पाठीमागून जबर धडक दिल्याने बैलगाडी वरील धुरकऱ्याचा उजवा पाय मांडी पासून तुटून धडावेगळा झाला तर बैलजोडी तील एक बैल जागीच ठार झाला तर बैलगाडी वरील दुसराही गंभीर जख्मी झाल्याची घटना घडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, बोलेरो पिक अप वाहन क्रमांक Mh 28 BB 9341 वाहनचालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरला वेगाने व निष्काळजीपणे चालवून मलकापूर शहराबाहेरील सालीपूरा फाट्यानजीक दुचाकीस पाठीमागून जबर धडक दिली या धडकेत गजानन बाबुराव जवरे वय ३५ हा जागीच ठार झाला तर पत्नी जख्मी झाल्याची घटना रात्री ९ वाजे दरम्यान घडली. बोलेरो चालकाने घटनास्थळावरून पोबारा करून पुढे बोदवड रोडवरील जांबुळधाब्या नजीक गिट्टी खदान जवळ बैलगाडी पाठीमागून जबर धडक दिल्याने बैलगाडी वरील धूरकरी धनराज बावस्कार याचा उजवा पाय मांडी पासून धडावेगळा झाला दुसरा सहकारी साहेबराव बावस्कार गंभीर जख्मी झाला या दोघा जखमींवर खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे. अपघाताची फिर्याद मधुसूदन पंजाबराव जवरे वय ३५ रा. चैतन्य वाडी मलकापूर यांनी शहर पोलीस स्टेशनला दिली असून बोलेरो पिकप वाहन चालक याचे विरुद्ध अ.प नं. ४८७/२६ कलम 281, 106 (1) 125 A, 125 B, 324(4)BNS सह कलम १८४, १८७ वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शहर पो. नि. गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरेश रोकडे करीत आहे. आज शोकाकुल वातावरणात गजानन बाबुराव जवरे रा. जांभबुळ शधाबा याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्याचे पश्चात पत्नी, एक मुलगा असा आप्त परिवार आहे.



# कोरोना प्रोत्साहन भत्ता रखडला; आशा, अंगणवाडीसेविकांचे धरणे आंदोलन

### जामोद ग्रामपंचायतीसमोर केली घोषणाबाजी

प्रतिनिधी ४ जुलै

**जळगाव जामोद:** कोरोना महामारी च्या काळात जीवाची पर्वा न करता आरोग्य सेवा, सर्वेक्षण आणि जनजागृतीची जबाबदारी पार पाडणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना जाहीर करण्यात आलेला कोरोना प्रोत्साहन भत्ता अद्याप पूर्णपणे मिळालेला नसल्याच्या निषेधार्थ जामोद ग्रामपंचायती समोर गुरुवारी धरणे आंदोलन केले.

शासनाने तातडीने थकीत प्रोत्साहन भत्ता अदा करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. कोरोना संसर्गाच्या काळात आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी सर्वेक्षण विलगी करणाची कुटुंब, माझी जबाबदारी' सह विविध शासकीय मोहिमा राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्या काळात शासनाने कोरोना प्रोत्साहन भत्ता देण्याची घोषणा केली होती. मात्र, आंदोलकांच्या म्हणण्यानुसार केवळ एका महिन्याचा भत्ता मिळाला असून, उर्वरित रक्कम पाच वर्षे उलटूनही अद्याप मिळालेली नाही.

**हक्काच्या मोबदल्यासाठी आंदोलनाची खंत**

कोरोनाकाळात नागरिकांच्या सेवेसाठी दिवस-रात्र काम करूनही आज हक्काच्या मोबदल्यासाठी आंदोलन करण्याची वेळ आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान सेविकांनी सांगितले की, कोरोना संसर्गाचा धोका असतानाही कुटुंबाची पर्वा न करता आरोग्य विभागाच्या सर्व मोहिमा यशस्वी करण्यासाठी त्यांनी काम केले. मात्र, जाहीर केलेला प्रोत्साहन भत्ता अद्याप न मिळाल्याने शासनाकडून अन्याय होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# क्षुल्लक कारणावरून वाद, १२ वर्षीय मुलीला काठीने मारहाण

### माय-लेकीविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ जुलै

**मलकापूर:** खेळताना झालेल्या किरकोळ वादातून १२ वर्षीय मुलीला काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना मलकापूर शहरातील सालीपुरा रमाबाई नगरात घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात माय-लेकीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेबी किसन सोनोने (वय ५५, रा. सालीपुरा रमाबाई नगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. १ जुलै रोजी दुपारी २ वाजता त्यांची १२ वर्षीय नात तक्षशीला उर्फ परी द्रोण सोनाळे घराबाहेर खेळत असताना तिची मैत्रीण मयुरी राहुल चव्हाण हिच्यासोबत किरकोळ वाद झाला. या वादाचा राग मनात धरून मयुरीची आई मीना राहुल चव्हाण आणि आजी पार्वताबाई राहुल नाईक यांनी तक्षशीलाला काठीने पाठीवर व हातावर मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच, धमकी दिल्याने भीतीपोटी मुलीने पहिल्या दिवशी हा प्रकार घरी सांगितला नसल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दुसऱ्या दिवशी, २ जुलै रोजी दुपारी तक्षशीलाची आजी बेबी सोनोने ह्या बाहेरगावाहून घरी परतल्यानंतर मुलीने त्यांना संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी मुलीला वैद्यकीय तपासणी उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविले. या प्रकरणी पोलिस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली मीना राहुल चव्हाण व पार्वताबाई राहुल नाईक यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३(५) आणि ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आदिवासी गाव रस्त्याविना

प्रतिनिधी ४ जुलै

**मेहकर :** लोणार तालुक्यातील मौजे मढी हे शंभर टक्के आदिवासी लोकसंख्या असलेले गाव आजही पक्क्या रस्त्याच्या सुविधेपासून वंचित असल्याचा गंभीर मुद्दा आमदार सिद्धार्थ खरात यांनी पावसाळी अधिवेशनात विधानसभेत उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होऊनही सुमारे ४०० लोकसंख्या असलेल्या या गावातील नागरिकांना दळणवळणाच्या मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले. आमदार खरात यांनी मढी गावाला जोडणारा सुमारे २ किलोमीटरचा पक्का रस्ता तातडीने मंजूर करून त्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत ७५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच रिसोड तालुक्यातील छोटी लोणी ते मढी या सुमारे १ किलोमीटरच्या रस्त्यालाही विशेष बाब म्हणून मंजुरी देऊन तातडीने काम सुरू करण्याची मागणी त्यांनी शासनाकडे केली. सभागृहात बोलताना आमदार खरात यांनी हा विषय केवळ रस्त्यापुरता मर्यादित नसून आदिवासी समाजाच्या विकासाचा, शिक्षणाचा, आरोग्य सेवांचा आणि मूलभूत हक्कांचा असल्याचे स्पष्ट केले.

# अंढेरा गावासाठी टँकर मंजूर

प्रतिनिधी ४ जुलै

**बुलढाणा:** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

अंढेरा येथे ३९३२ पशुधन व ८८७० लोकसंख्येसाठी तीन टँकरद्वारे २ लाख ४५ हजार ६३५ लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी.

# तलाठ्याच्या परवानगीनंतर गौण खनिज उपसा व वाहतुकीस मुभा

### शेतकऱ्यांना दिलासा

प्रतिनिधी ४ जुलै

**सिंदखेडराजा :** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती सुधारणा, शेतरस्त्यांची दुरुस्ती, विहीर बांधकाम तसेच जनावरांच्या गोठ्यांसाठी आवश्यक गौण खनिज नियमानुसार उपलब्ध करून घेता यावे, या उद्देशाने महसूल व वन विभागाने २ जुलै रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार संबंधित तलाठ्याच्या लेखी परवानगीनंतर राज्यातील शेतकऱ्यांना गौण खनिजाचा उपसा व वाहतूक करता येणार आहे. शासन निर्णयानुसार जलसंपदा विभाग, मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलकुंभतसेच स्वतःच्या शेतातील गाळ, माती, मुरूम, दगड आदी गौण खनिजांचा उपसा करून त्याचा वापर शेती सुधारणा, शेतरस्त्यांची दुरुस्ती, पावसाळ्यात निर्माण होणारे चिखल व खड्डे भरणे, विहीर बांधकाम तसेच जनावरांच्या गोठ्यांच्या बांधकामासाठी करता येईल. या कामांसाठी संबंधित तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील. अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत परवानगीबाबत निर्णय घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. तसेच जलसंपदा विभाग, मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जलकुंभांमधून गाळ अथवा माती काढण्यासाठी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. शासनाने स्पष्ट केले आहे की, शेती व वैयक्तिक वापरासाठी परवानगीने घेतलेल्या गाळ, माती, मुरूम अथवा अन्य गौण खनिजाची ट्रॅक्टर, ट्रॉली किंवा बैलगाडीद्वारे वाहतूक केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात येणार नाही. मात्र, गौण खनिजांचा व्यावसायिक वापर, विक्री अथवा बेकायदेशीर उत्खनन केल्यास विद्यमान कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

# उपवनसंरक्षकांनी जाणून घेतल्या मेंढपाळ बांधवांच्या अडचणी!

प्रतिनिधी ४ जुलै

**खामगाव:** बुलढाणा वन विभागाचे उपवनसंरक्षक जमीर शेख यांनी खामगाव वन परिक्षेत्रा लगत वास्तव्यास असलेल्या मेंढपाळ बांधवांची भेट घेऊन त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी वनसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाबाबत मार्गदर्शन करत वन विभाग त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले.

भेटीदरम्यान मेंढपाळां नी वनक्षेत्रातील वावर, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चाऱ्याची कमतरता, तसेच वन्य प्राण्यां मुळे उद्धवणाऱ्या अडचणींबाबत माहिती दिली. यावर उपवनसंरक्षक जमीर शेख यांनी वन विभागाशी समन्वय राखून शाश्वत पद्धतीने उपजीविका करण्याचे आवाहन केले. यानंतर त्यांनी हटकर यांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाला भेट देऊन त्याची पाहणी केली. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या उपक्रमातील कल्पकता, स्थानिक लोक सहभागाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे नागरिकांना प्रेरणा मिळण्याबरोबरच पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी खामगाव चे वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्निल पवार, वनपाल शिंदे, वनरक्षक बिल्लारी, जुमडे, गवई, कुलट, फोलाने तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. ४ जुलै २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनसाठी मनपा प्रशासनाव्दारा झोननिहाय चार पथकांचे गठन

**अकोला:** दि. २ जुलै २०२६ – दि. २९ जून २०२६ रोजी संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली व मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या उपस्थितीत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्याव्दारे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने विशेष बैठक घेण्यात आली होती.

या अनुषंगाने १ जूलै २०२६ रोजी अकोला महानगरपालिका आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका क्षेत्रात संभाव्य नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास नागरिकांची दुर्दशा टाळण्याकरिता व परिस्थितीवर तात्काळ नियोजन व उपाययोजना करण्याकरिता पुर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण क्षेत्रीय कार्यालय (झोन कार्यालय) निहाय चार पथकांचे गठन करण्यात आले आहे. या पथकांमध्ये संबंधीत झोन कार्यालयाचे सहा.आयुक्त हे नोडल अधिकारी तथा पथक प्रमुख आहे व त्यांच्या अधिनस्त बांधकाम विभाग, विद्युत, नगररचना विभागातील कनिष्ठ अभियंता, लिपीक आणि स्वच्छता निरीक्षकांचा समावेश असलेले चार पथकांचे गठन करण्यात आले आहे.

# गोयनका, जैन लॉन्स, खंडेलवाल ओपन स्पेसचा वाद नाही-विजय अग्रवाल

## नगरसेवक सागर भारुकांचे आरोप बिनबुडाचे आणि तथ्यहीन

प्रतिनिधी ४ जुलै

**अकोला:** अकोला शहरातील ओपन स्पेसच्या मुद्यावरून मनपा प्रशासनाला आणि सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न करणाऱ्या सागर भारुका यांना स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी जोरदार दणका दिला आहे. 'सागर भारुका यांनी केलेले सर्व आरोप पूर्णपणे बिनबुडाचे, तथ्यहीन आणि केवळ दिशाभूल करणारे आहेत,' असा घणाघाती प्रहार अग्रवाल यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची नेमकी तांत्रिक आणि कायदेशीर स्थिती काय आहे, याचा पाढाच त्यांनी पुराव्यासकट वाचून दाखवला. आज सकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत खा.अनुप धोत्रे, आ.रणधीर सावरकर, महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, पवन महल्ले, जयंत मसने, सुनील मेश्राम, रफिक सिद्दीकी आदींची उपस्थिती होती.

विजय अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, अकोला शहराची मूळ हद्दीची विकास योजना १५ डिसेंबर २००४ पासून अंमलात आली आहे. यामध्ये मौजे अकोला येथील नझुल शीट क्र. ५३, भूखंड क्र. ०६ (भाग) मधील १४१३.३३ चौ.मी. जागा हिरव्या रंगाने 'मैदान' म्हणून दर्शविली आहे. तत्कालीन नगरपालिकेने १९६२ मध्ये हा अभिन्यास (ले-आऊट) मंजूर करताना ही जागा मैदान म्हणून दाखवली होती, म्हणूनच २००४ च्या विकास योजनेत ती तशीच राहिली.या जागेची मूळ मालकी 'गोयनका' यांच्या नावावर असल्याने, ती चूक सुधारण्यासाठी महापालिकेने २००९ मध्येच संचालक, नगर रचना (पुणे) यांच्याकडे 'आरेखकीय चूक दुरुस्ती'चा प्रस्ताव पाठवला होता. मात्र, त्यावर शासनाकडून दीर्घकाळ कोणताही निर्णय झाला नाही. शासनाने पुन्हा पत्र पाठवून ही 'आरेखकीय चूकच'असल्याचे ठामपणे सांगत कारवाई करण्याचे स्पष्ट व थेट आदेश दिले. शासनाच्या याच आदेशाचे पालन करत महापालिकेने २१ जानेवारी २०२५ रोजी चूक दुरुस्तीचे आदेश जारी केले.'जर शासनाच्या आदेशानेच ही प्रक्रिया झाली, तर त्यात महापालिकेचा किंवा स्थानिक पदाधिकाऱ्यांचा घोटाळा कुठे आला?' असा संतप्त सवाल विजय अग्रवाल यांनी उपस्थित केला.




### अकोलेकरांना दीड ते दोन वर्षांत मिळणार रोज पाणी - आ.रणधीर सावरकर

अकोला शहरातील नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर येत आहे. येत्या दीड ते दोन वर्षांच्या कालावधीत अकोला शहरासह हद्दवाढ झालेल्या सर्व भागांमध्ये दररोज पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे. एका पत्रकार परिषदेत बोलताना आ.रणधीर सावरकर यांनी या महत्वपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही मुख्य स्त्रोतांवरून ही परिस्थिती निर्माण होणार आहे. या योजनेचा एक भाग म्हणून शहराच्या विविध भागांत पिण्याच्या पाण्याच्या नवीन टाक्या बांधण्यात येणार आहेत. तसेच, 'निमकर्दा' येथे पाण्याचे मोठे स्टोरेज करून, तिथून पाणी फिल्टर केल्यानंतर ते संपूर्ण अकोला शहराला वितरित केले जाईल. या नियोजित प्रकल्पामुळे आगामी काळात अकोलेकरांची पाणीटंचाईच्या समस्येतून कायमची सुटका होण्याची शक्यता आहे. दीड ते दोन वर्षाच्या काळामध्ये अकोल्या शहरामध्ये हद्दवाढीसह सगळ्या शहरांमध्ये हे पाणी रोजही देऊ शकतो आपण अशी परिस्थिती दोन्ही ठिकाणावरून आपल्याला निर्माण होणार आहे. त्याच्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधल्या जाणार आहेत. निमकर्दाला त्याचं एक स्टोरेज करून तिथून आपल्याला हे पाणी मिळणार आहे फिल्टर करून आणि अकोल्यात आणले जाणार आहे.

### बिल्डरांसाठी रोड करतात आमदार - विजय अग्रवाल यांचा आरोप

अकोला पश्चिम चे आमदारांनी स्थानिक लोकांसाठी विकास कामांचा निधी खर्च करण्याची गरज आहे. पण, ते बिल्डरांनी सांगितले की रस्ते करतात. ते रेल्वे स्टेशन चे अग्रेसन चौकाचे दूभाजक पुन्हा करण्याची गरज नसताना त्याचे सौंदर्यीकरणावर लाखो रुपये अकोला पश्चिम च्या आमदारांनी केला तो निधी योग्य ठिकाणी खर्च करण्याची गरज होती. पण, तसे झाले नाही असा दावा विजय अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत केला. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी आज महापौरांच्या वाक्याचे समर्थन यावेळी केले. महासभेत महापौरांनी काँग्रेस नगरसेविका निलोफर खान यांना आमदारांकडे विकास निधी मागण्याची सुचना केली होती.

### गोयनका,जैन लॉन्स, खंडेलवाल ओपन स्पेस नियमानुसार

सागर भारुका जे मांडत आहे त्याची तक्रार अजय शर्मा यांनी १२ वर्षांपूर्वी केलेली आहे. गोएंका लेआउटची. आणि ती ओपन स्पेस कुणालाही आपण दिलेली नाही, त्यांनाही वापरण्याला दिलेली नाही आहे. त्या ओपन स्पेसमध्ये ते न्यायालयामध्ये गेले होते. माननीय न्यायालयाने जो निकाल दिला त्यावर अपील झाली, त्याच्यानंतर आता ती जी जागा आहे, शासनाकडूनही त्यांना... शासनाने त्यांनी जे कागदपत्र दाखल केले होते त्याच्यात पत्रव्यवहार झाला, शासनाने सांगितली ही जागा आहे म्हणून आयुक्त साहेबांनी त्याच्यामध्ये पुन्हा पाठवलं की ही ओपन स्पेस आहे. आणि म्हणून कोणताही घोटाळा झाला नाही. याच्यामध्ये विरक बाईंनी तक्रार केलेली आहे, याच्यामध्ये अजय शर्मांनी तक्रार केलेली आहे, याच्यामध्ये मी सुद्धा तक्रार केलेली आहे. हा माझा प्रभाग होता. जैन लॉन ही जैन लॉन मालकीची जागा आहे, ही ओपन स्पेस नाही आहे. खंडेलवाल यांच्या बाजूची जी ओपन स्पेस आहे, ती त्याला आपण कधीही दिलेली नाही, त्याच्या ताब्यात नाही. काही ओपन स्पेस या डेव्हलप न झाल्यामुळे त्याचा वापर लोकं करतात, म्हणून कोणताही घोटाळा झाल्याचं दिसत नाही.

**- विजय अग्रवाल**
स्थायी समिती सभापती,मनपा,अकोला.

### अकोला शहराला मिळणार ४२ सिटी बस - खा.अनुप धोत्रे

अकोला शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सोयीसाठी एक अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलण्यात आले आहे. अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे अकोला शहराला एकूण ४२ नवीन सिटी बस मंजूर झाल्या आहेत. या संदर्भातील माहिती नुकत्याच झालेल्या एका पत्रकार परिषदेत देण्यात आली. या योजनेच्या पुढील अंमलबजावणीसाठी कालच अकोला महानगरपालिका आणि संबंधित बस कंपनी यांच्यामध्ये अधिकृत करार यशस्वीरित्या पार पडला आहे. या नवीन बसेसमुळे अकोलेकरांचा प्रवास अधिक सुखकर होणार असून, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे. शहरात विविध विकास योजना पूर्ण करण्याचे काम सध्या वेगाने सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# तुकाराम मुंढेंच्या आदेशाला कोर्टात आव्हान!



प्रतिनिधी ४ जुलै

**बुलडाणा :** अन्नसुरक्षा आणि मानके कायद्यांतर्गत प्रतिबंधित खाद्यपदार्थांच्या निर्मिती, वाहतूक आणि विक्रीमध्ये सहभागी असलेल्या आरोपी विरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याबद्दल अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी आदेश जारी केले होते. मात्र या आदेशाच्या कायदेशीर वैधतेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. बुलढाणा येथील मोहम्मद इक्बाल मोहम्मद शफी यांनी तुकाराम मुंढे यांचा आदेश मनमानी करणारा, एकतर्फी व सामान्यांच्या अधिकारांचा दुरुपयोग करणारा आहे, असा आक्षेप घेत याचिका दाखल केली आहे. अशातच तुकाराम मुंढे यांचा आदेश अवैध ठरवून रद्द करण्यात यावा, अशी मागणी या याचिकेच्या माध्यमातून न्यायालयात करण्यात आली आहे.दरम्यान, तुकाराम मुंडे यांनी अन्नसुरक्षा आणि मानके कायद्यातर्गत १२ जून २०२६ रोजी आदेश जारी करून प्रतिबंधित खाद्यपदार्थांचे उत्पादन, त्यात अर्थसहाय्य पुरवठा व वाहतूक करणारे, तसेच त्यासाठी गोदाम पुरवणारे व किरकोळ विक्री करणाऱ्या विरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. याप्रकरणी नागपूर खंडपीठाने अन्न व औषधे प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, तसेच अन्न व औषधे प्रशासन आयुक्त आणि पोलीस महासंचालक यांना नोटीस बजावून तीन आठवड्यात उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. अशातच आता बुलढाणा येथील मोहम्मद इक्बाल मोहम्मद शफी यांनी तुकाराम मुंढे यांचा आदेश मनमानी करणारा, एकतर्फी व सामान्यांच्या अधिकारांचा दुरुपयोग करणारा आहे, असा आक्षेप घेत याचिका दाखल केली आहे.

# स्मार्ट मीटर विरोधात ग्रामस्थ आक्रमक!

प्रतिनिधी ४ जुलै

**अकोट :** तालुक्यातील लोहारी खुर्द, लोहारी बु. व चिंचखेड खुद.'येथील नागरिकांनी स्मार्ट वीज मीटरमुळे वाढलेली अवाजवी वीज बिले, दोषपूर्ण स्मार्ट मीटर तसेच शेतकऱ्यांना मिळणारा अपुरा व वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा या गंभीर प्रश्नांवर महावितरणच्या मुंडगाव कार्यालयावर धडक देत तीव्र निषेध व्यक्त केला. सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांचे प्रतिनिधी राम म्हैसने यांच्या पुढाकारात ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी कार्यालयात तब्बल दोन ते तीन तास प्रतीक्षा केली. मात्र, मुख्य अधिकारी आठ दिवसांच्या रजेवर असल्याचे सांगण्यात आले, तर त्यांच्या जागी जबाबदारी असलेले अधिकारी देखील कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी हा प्रकार जनतेचा अपमान आणि महावितरण प्रशासनाचा बेजबाबदार कारभार असल्याची तीव्र भावना व्यक्त केली. काही वेळानंतर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी निवेदन स्वीकारण्याची तयारी दर्शविली. मात्र, जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्यामुळे ग्रामस्थांनी कर्मचाऱ्यांकडे निवेदन न देता थेट अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला निवेदन चिटकवून अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला.

# अनियंत्रित चारचाकी थेट बसला धडकली

## वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

प्रतिनिधी ४ जुलै



**अकोला :** शहरातील मुख्य बसस्थानकासमोरील धिंग्रा चौकात शुक्रवारी पावसादरम्यान एक चारचाकी वाहन अनियंत्रित होऊन बसला धडकले. यावेळी चौकात कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, चारचाकी वाहन टॉवर चौकाकडून गांधी चौकाच्या दिशेने जात होते, तर बस अशोक वाटिका परिसरातून मुख्य बस डेपोच्या दिशेने येत होती. धिंग्रा चौकात दोन्ही वाहनांचा समोरासमोर संपर्क होऊन अपघात घडला. घटनेच्या वेळी परिसरात पाऊस सुरू असल्याने रस्ता निसरडा झाला होता. त्यामुळे वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघातानंतर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली; मात्र वाहतूक पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली.या अपघातात कोणलाही गंभीर दुखापत झाली नसून वाहनांचे किरकोळ नुकसान झाले आहे. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

# अकोला शहराच्या महत्वाकांक्षी पी.एम.ई–बस सेवा अंतर्गत पुरवठादार कंपनी सोबत करारनाम्याची कार्यवाही पूर्ण

प्रतिनिधी ४ जुलै



**अकोला :** दि. ३ जुलै २०२६ – अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना क्षेत्रातील नागरिकांना अत्यल्प दरात सर्व सुविधा युक्त, वातानुकूलित आणि सुरक्षित शहर वाहतुक उपलब्ध व्हावे या उद्देशाने अकोला शहराचे खासदार अनुपजी धोत्रे, आमदार रणधीरजी सावरकर, अकोला शहराचे पालकमंत्री अॅड.आकाशजी फुंडकर यांच्या अथक प्रयत्नाने प्रधानमंत्री यांच्या महत्वाकांक्षी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री ई-बस सेवा योजने अंतर्गत अकोला शहराच्या पब्लीक ट्रांसपोर्टसाठी अकोला महानगरपालिकेस १२ मीटर लांबीच्या १४ आणि ९ मीटर लांबीच्या २८ असे एकुण ४२ ई-बस प्राप्त होणार आहेत.

त्या अनुषंगाने आज दि. ३ जुलै २०२६ रोजी बस पुरवठा करणा-या नेक्स्टजेन ग्रीन मोबीलिटी प्रायव्हेट लिमिटेड, फरीदाबाद या कंपनी सोबत व्दिपक्षीय करारनामा मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे, महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाचे जिल्हाध्यक्ष विजय देशमुख, उपमहापौर अमोल गोगे, भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने, सभागृहनेता पवन महल्ले, सभापती, महिला व बाल कल्याण सौ.आरती घोगलिया, मनपा विरोधी पक्ष नेता डॉ.झिशान हुसैन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.) गटनेता रफीक सिद्दीकी, ए.आय.एम.आय.एम.च्या गटनेत्या मैमुना बी अब्दुल रशीद, नगरसेविका सौ.सुनितातार्ई अग्रवाल, नगरसेवक सिध्दार्थ उपरवट यांच्या विशेष उपस्थितीत स्वाक्षरी करून करारनामा करण्यात आला आहे. ई-बस साठीचे चार्जिंग स्टेशनचे काम अंतीम टप्प्यात आहे तसेच करारनामा केल्यानंतर एक महिन्याच्या आत सदर कंपनीव्दारे बस उपलब्ध करून देण्यात येणार असून येणा-या १५ ऑगस्ट पासून अकोला शहरातील ई-बस सेवा सुरू करण्याचे मानस असल्याचे यावेळी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी यावेळी सांगितले आहे. यावेळी शहर अभियंता अजय गुजर, परिवहन सेवा विभागाचे नोडल अधिकारी अमोल डोईफोडे, नेक्स्टजेन ग्रीन मोबीलिटी प्रायव्हेट लिमिटेडचे प्रोजेक्ट मॅनेजर निशांत शहा, डेपो मॅनेजन जय देसाई व इतर अधिकारी/कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# कर्जमुक्तीचा लाभ मिळेपर्यंत थकीत रकमेवर व्याज आकारू नये!

## शासनाचा आदेश; महाकर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांना दिलासा

प्रतिनिधी ४ जुलै

**अमरावती :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवारी शासननिर्णय जारी केला आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने २ जून २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना मंजूर केली असून सध्या या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पात्र अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. दोन लाख



रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे.

ही प्रक्रिया सुरू असताना शेतकऱ्यांच्या थकीत पीककर्जावर व्याजाची वाढ होऊ नये आणि कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्यात अडथळे येऊ नयेत, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कर्जमाफी आणि एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या पात्र थकीत रकमेवर १ एप्रिल २०२६ पासून ते कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ खात्यात जमा होईपर्यंत कोणतेही व्याज आकारू नये, असे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९-अ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी करण्यात आला असून, तो राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना लागू राहणार आहे.

या योजनेसाठी शासनाने मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार केली असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर कर्जखात्यांची पडताळणी, अपात्र खात्यांचे वगळणे, लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण आणि कर्जमाफीची रक्कम संबंधित खात्यात जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# अंबाबरवा अभयारण्यातील जंगल सफारी तीन महिन्यांसाठी बंद !

प्रतिनिधी ४ जुलै




वरिष्ठांच्या आदेशानुसार अंबाबरवा अभयारण्यातील जंगल सफारी १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवण्यात आली आहे. मात्र, वनउद्याने पर्यटकांसाठी खुली राहतील.

**अजय बावणे,**
वनपरिक्षेत्र अधिकारी
(वन्यजीव), सोनाळा

**संग्रामपूर:** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत संग्रामपूर तालुक्यातील अंबाबरवा अभयारण्यातील जंगल सफारी पुढील तीन महिन्यांसाठी बंद ठेवण्यात आली आहे. पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेचा विचार तसेच वन्यजीव व अधिवासाचे संरक्षण लक्षात घेऊन १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत कोअर क्षेत्रातील पर्यटन बंद ठेवण्याचा निर्णय वनविभागाने घेतला आहे. मात्र, अभयारण्यातील वनउद्याने पर्यटकांसाठी खुले राहणार असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे.

नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार कोअर क्षेत्रातील सर्व पर्यटन प्रवेशद्वारे तीन महिन्यांसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. पावसाळ्यात जंगलातील रस्ते चिखलमय होणे, दरडी कोसळण्याचा धोका वाढतो, असे वनविभागाने सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK
CMYK